रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ७४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

पाहिजेत
१. अकाऊंटंड क्लार्क
२. गार्डनसाठी महिला
३. किचन हेल्पर
४. रिसेप्शनसाठी व्यक्ती
अर्जासह समक्ष भेट
हॉटेल साईइन, चोंढी, अलिबाग-रेवस रोड, अलिबाग

रायगड, मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




## परदेश दौरा करणारा अधिकारी अडचणीत

### माहिती न दिल्यामुळे संजय सावंत यांचे प्रथम अपील

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

महसूल विभागाच्या एका अधिकाऱ्याने दुबई दौरा जानेवारी २०२५ मध्ये केल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांच्या माहिती अधिकार अर्जामुळे उघडकीस आली आहे. याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार महसूल व जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांनी सावंत यांना उपलब्ध करून दिली आहे. शासन परिपत्रक (क्रमांक परदौ-१४२०/प्र.क.२६/११, दि. १ फेब्रुवारी २०२१) नुसार अशा खासगी दौऱ्यांकरिता संबंधित अधिकाऱ्याने मुख्यालय सोडण्याची पूर्वपरवानगी व सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक आहे. परंतु; या परवानगीचा कोणताही ठोस उल्लेख उपलब्ध माहितीमध्ये नसल्यामुळे या अधिकाऱ्याने परदेश दौऱ्यासाठी परवानगी घेतली होती का? याबाबतची माहिती मिळण्यासाठी सावंत यांनी प्रथम अपील दाखल केले आहे.

या अपीलाची सुनावणी निवासी उपजिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे दि.२० ऑगस्ट रोजी होणार असल्याची माहिती सावंत यांनी दिली आहे. या अपिलाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याचे नाव जाहीर करण्यात येईल, असे सावंत यांनी म्हटले आहे. रायगड जिल्ह्यातील एका उच्चपदस्थ महसूल अधिकाऱ्याने शासनाची कोणतीही पान २ वर

## वे|ध|क

### मतचोरीची बच्चू कडूंनाही ऑफर

**मुंबई :** मतेचोरीबाबत आपल्यालाही ऑफर होती, असा खळबळजनक दावा प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी केला आहे. ज्यांची मते मिळणार नाहीत त्यांची नावेच मतदार यादीतून उडवून टाकायची आणि दुसरी १० हजार नावे घुसवून ती मते आपल्याला मिळतील अशी व्यवस्था करून देण्याची ऑफर आपल्याला विधानसभा निवडणुकीपूर्वी देण्यात आली होती. त्यासाठी तशा दहा हजार लोकांची यादी आपल्याकडे मागण्यात आली होती. वेळ आली तर याचे पुरावा आपण देऊ, असे कडू म्हणाले आहेत.

# अतिवृष्टीचा धोका



(छायाचित्र : समीर मालोदे)

**21 ऑगस्टपर्यंत मुसळधार पाऊस कोसळणार**

**उरण सर्वात कमी 51 मिमी**

**म्हसळा सर्वात जास्त 215 मिमी**

**एकूण पाऊस 1515.2 मिमी**

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने धुमाकूळ घातला आहे. नदी, धरणे, शेत जमीनी पाण्याने तुडुंब भरून गेल्या आहेत. रस्त्यावरून पाणी वाहत असल्याने जिल्ह्यातील अलिबाग, पेण, रोहा मार्गावरील वाहतूकीवर त्याचा परिणाम झाला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे पावसातून मार्ग काढताना अडचणी निर्माण झाल्या. २१ ऑगस्टपर्यंत राज्यात मुसळधार पाऊस कोसळणार आहे. त्यामुळे रायगडला अतिवृष्टीचा धोका निर्माण झाला आहे. पान २ वर

### आज शाळांना सुट्टी

**रायगड जिल्ह्याला रेड अलर्टचा इशारा देण्यात आल्यामुळे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील अंगणवाडी, सरकारी व खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना आज (दि.१९) सुट्टी जाहीर केली आहे.**

## पुणे शहर स्वाईन फ्लूच्या विळख्यात

| पुणे | प्रतिनिधी |

सध्याच्या पावसाळी वातावरणामुळे पुणे शहरात हंगामी फ्लू असलेल्या विषाणूजन्य आजारांनी डोके वर काढले आहे. यामध्ये दरवर्षीप्रमाणे 'एच१ एन१' (स्वाईन फ्लू) सह 'एच३ एन२'च्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. मात्र, कडकडून ताप भरत असल्याचे वगळता इतर लक्षणे सौम्य स्वरूपाची आहेत. त्यामुळे रुग्णालयात भरती होण्याचे प्रमाण वाढलेले नाही. ही लक्षणे फ्लूविरच्या गोळ्या व मुलांना फ्लूविर हे विषाणूविरोधी औषध दिल्यानंतर लक्षणे कमी होत असल्याची माहिती खासगी रुग्णालयातील पान २ वर






## मुसळधार पावसामुळे मुंबई विस्कळीत

**मुंबई :** मुंबईत सोमवारी (दि.१८) सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. रस्ते, नाले दुतर्फा भरुन वाहत आहेत, रस्त्याने चालणंदेखील अवघड झालेले आहे. मुंबई शहरासह उपनगरांमध्ये रविवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. या पावसामुळे रस्ते वाहतूक तसेच रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. आठवड्याचा पहिलाच दिवस असल्याने विद्यार्थ्यांची शाळांमध्ये लगबग सुरु होती. परंतु; पावसामुळे मुंबईतल्या शाळांना अर्ध्यातूनच सुट्टी जाहीर करण्यात आलेली. पान २ वर

## साळाव-तळेखार रस्त्यावर ठिय्या आंदोलन

- **शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाची आक्रमक भूमिका**
- **एमएसआयडीसी, कंत्राटदारावर संतप्त प्रतिक्रिया**

| रेवदंडा | प्रतिनिधी |

साळाव ते तळेखार रस्त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. हा १३ किमीचा रस्ता ६ महिन्यांपासून खोदून ठेवलेला आहे. दोन दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणे अत्यंत जिकरीचे झाले आहे. त्यामुळे नागरिकांचा संताप उसळला आहे. या दुरावस्थेबाबत एमएसआयडिसी व कंत्राटदारावर संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत साळाव बिर्ला मंदिर येथे शिवसेना (उद्धव ठाकरे) पान २ वर



## शिरसाटांकडून भ्रष्टाचार

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

नवी मुंबई परिसरातील गरीब आणि सामान्य आगरी समाजातील नागरिकांच्या घरांसाठीची सिडकोची हजारो कोटी रुपये बाजारभाव असलेली १५ एकर जमीन मंत्री संजय शिरसाठ यांनी बिवलकर कुटुंबाच्या वारसांच्या घशात घातली, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. याविरोधात महाविकास आघाडीच्यावतीने बुधवारी (दि.२०) नवी मुंबईतील सिडको कार्यालयावर पान २ वर




पान १ वरुन

## अतिवृष्टीचा धोका

त्यामुळे दरडग्रस्त व पुरग्रस्त गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

गेली अनेक दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा लागून राहिली होती. अखेर गेल्या दोन दिवसांपासून पावसाने पुन्हा सुरुवात केली. सलग दोन दिवस पावसाची रिपरिप सुरु आहे. या पावसामुळे नदी, धरणे, तलाव, विहीरी पाण्याने तुडूंब भरल्या आहेत. शेताच्या बांधावरून पाणी वाहू लागले आहे. जिल्ह्यातील लघू पाट बंधारे विभागातील धरणेदेखील ओसंडून वाहू लागले. जिल्ह्यातील अंबा, कुंडलिका, पाताळगंगा, उल्हास व गाढी नदीदेखील पावसाच्या पाण्याने भरून गेल्या. रोहामधील अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. तर, कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली. त्यामुळे नदी किनारी असलेल्या गावांतील नागरिकांनी सर्तक राहण्याचा इशारा स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आला.

भारतीय हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे, राज्यात दि.२१ ऑगस्टपर्यंत अतिवृष्टीसह वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोकण व मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि.१९) रेड, बुधवारी (दि.२०) ऑरेंज तसेच गुरुवारी (दि.२१) यलो अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यात २५० हून अधिक दरडग्रस्त व पुरग्रस्त गावे आहेत, या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**मासेमारीसाठी जाऊ नये**

जिल्ह्यामध्ये २१ ऑगस्टपर्यंत जोरदार पाऊस पडणार आहे. कोकण किनारपट्टीत ५०ते ६० किलो मीटर ताशी वाऱ्यासह समुद्रात खवळलेली स्थिती राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मच्छिमारांनी या कालावधीत समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**खबरदारी घेण्याचे आवाहन**

आपत्तीपासून सतर्क राहण्यासाठी सद्यस्थितीमध्ये नागरीकांना सचेत ॲपमार्फत अलर्ट संदेश पाठविले जात आहेत. आपत्तीच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थितीकरीता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात ओल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील अंबा नदीने धोका पातळी तसेच कुंडलीका नदी व रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी आणि कोदवली नदीने इशारा पातळी ओलांडली असून याबाबत नागरिकांना सूचित करण्यात आले आहे. नागरिकांनी पूरस्थिती पासून सुरक्षित राहण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सूचना देण्यात आल्या असून खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याच्या सुचना**

जिल्ह्यात तीन दिवसांमध्ये मुसळधार पाऊस पडणार आहे. या कालावधीत पुरजन्य परिस्थितीसह वादळामुळे झाडे कोसळण्याची भिती आहे. त्यामुळे या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निर्णय घेण्याच्या सुचना जिल्हा शिक्षणाधिकारी प्राथमिक विभागाने तालुका शिक्षणाधिकारी यांना दिल्या आहेत. यादरम्यान शाळा सुरु अथवा बंद ठेवण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याबाबत सांगण्यात आले होते.

हवामान विभागाच्या माहितीनुसार अलिबागमध्ये ८६ मिमी पाऊस पडल्याची नोंद असून मुरुडमध्ये ८० मिमी, पेण ८२ मिमी, पनवेल ११६.२ मिमी, कर्जत ५५ मिमी, खालापूर ६०मिमी, माथेरान ९२ मिमी, रोहा १२० मिमी, सुधागड ७८ मिमी, माणगाव ९१ मिमी, तळा ८८ मिमी, महाड ९२ मिमी, पोलादपूर १०७ मिमी, श्रीवर्धन १०२ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

## मुसळधार पावसामुळे मुंबई विस्कळीत

ठाण्यासह उपनगरांमधल्या शाळाही सोडून देण्यात आलेल्या होत्या. तसेच, मंगळवारी (दि.१९) देखील अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून ठाणे जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईतल्या शाळांनाही सुट्टी देण्याची मागणी होती. त्यामुळे मुंबईतल्या शाळांनाही सुट्टी जाहीर केली आहे. तसेच, नवी मुंबई नवी मुंबई महानगरपालिकेने महानगर पालिकेच्या शाळांबरोबर शहरातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

## साळाव-तळेखार रस्त्यावर ठिय्या आंदोलन

पक्षातर्फे सोमवारी (दि.१८) ठिय्या आंदोलन छेडण्यात आले. हे आंदोलन शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली, उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश्री मिसाळ, मुरूड तालुकाप्रमुख नवशाद दळवी, युवासेना तालुकाप्रमुख किशोर काजारे, चणेरा विभाग प्रमुख मनोज तांडेल, चोरडे सरपंच तृप्ती घाग, साळाव सरपंच वैभव कांबळे, मिठेखार सरपंच अशोक वाघमारे, नागाव माजी सरपंच नंदकुमार मयेकर, विशाल तांबडे, रमेश गायकर, सनी ठाकूर यांच्यासह कार्यकर्ते व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने भर पावसात रस्त्यात बसून छेडले.

यापूर्वी राजश्री मिसाळ यांनी साळाव ते तळेखार रस्ताच्या दुरवस्थेबाबत रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षकांना निवेदनाद्वारे दिला होता. त्यानुसार सोमवारी भर पावसात उपस्थित जमावाने रास्ता रोको आंदोलन छेडले. यावेळी प्रशांत मिसाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, एमएसआयडीसी व कंत्राटदार यांच्या मनमानी व पोलिसांना हाताशी धरून चालविलेल्या दहशतीच्या विरोधात स्फोटक व्यक्तव्ये केली. तसेच, काम सुरू होईपर्यंत रूग्णवाहिका तैनात ठेवावी, अशी मागणी लावून धरली. राजश्री मिसाळ व युवासेना अध्यक्ष किशोर काजारे यांनी देखील एमएसआयडीसी व कंत्राटदार यांच्या भोंगळ कारभाराबाबत हल्लाबोल केला.

आंदोलनादरम्यान निवेदन एमएसआयडीसीचे मुख्य अधिकारी एम.के. सिंग यांना देण्यात आले. नागरिकांनी गणेशोत्सवाआधी सर्व खड्डे भरून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, डिसेंबर २०२५ पूर्वी संपूर्ण महामार्गाचे काँक्रिट काम पूर्ण करावे, कामादरम्यान अभियंता उपस्थित असावा, प्रतिबिंबक व सूचना फलक लावावेत आणि कुचराई झाल्यास व कंत्राटदार जबाबदार धरावा, अशा ठोस मागण्या केल्या. यावर सिंग यांनी २३ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण करण्यात येईल, अशी हमी दिली आहे. तसेच, मागण्या पुर्ण करण्यास दुर्लक्ष केल्यास नवरात्रीच्या आधी यापेक्षाही मोठ्या स्वरूपाचे आंदोलन छेदण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांकडून देण्यात आला आहे.

## पुणे शहर स्वाईन फ्लूच्या विळख्यात

तज्ज्ञ डॉक्टर देतात. याबाबत अधिक माहिती देताना भारती विद्यापीठ रुग्णालयाचे वरिष्ठ नवजात व बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रमोद सूर्यवंशी म्हणाले, सध्या फ्लूचे रुग्ण वाढलेले आहेत. त्यांच्या नमुन्यांची तपासणी केली असता त्यांच्यामध्ये स्वाईन फ्लूच्या 'एच १ एन १' या विषाणूंचा स्ट्रेन आढळून येत आहे. त्या खालोखाल हंगामी फ्लू असलेला 'एच ३ एन २' या विषाणूच्या उपप्रकाराचे प्रमाण वाढलेले आहे. यामुळे मुलांना १०२ ते १०४ फॅरेनाइट ताप येणे, सोबत थंडी वाजून येणे, खोकला येणे ही लक्षणे दिसत आहेत. हा ताप तीन ते चार दिवस राहतो. काही मुलांमध्ये तापेचे झटके देखील येत आहेत. स्वाईन फ्लूवरील फ्लूविर औषध दिल्यावर तो उतरतो. तसेच, लक्षणांनुसार उपचार दिले जातात. तसेच 'आरएसव्ही' 'ॲडिनो व्हायरस' या विषाणूंचे देखील प्रमाण दिसून येत आहे मात्र ते तुलनेने कमी आहे.

## परदेश दौरा करणारा अधिकारी अडचणीत

पूर्वपरवानगी न घेता परदेश दौरा केल्याचा दावा सावंत यांनी केल्यानंतर प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली होती. सावंत यांनी याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांकडे तसेच जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे माहिती अधिकारामध्ये अर्ज करून याबाबत माहिती मागविली होती. सरकारी अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्याबद्दल माहिती मिळवण्यासाठी नागरिक माहिती अधिकार (आरटीआय) कायद्याचा वापर करू शकतात. या कायद्यांतर्गत, नागरिक संबंधित विभागाकडून या दौऱ्यांची माहिती मागवू शकतात.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील**

दौऱ्याचा उद्देश, कालावधी, खर्च आणि इतर संबंधित तपशील यामध्ये अधिकारी कोणत्या कारणास्तव परदेश दौऱ्यावर गेले होते? प्रवासाची तारीख, विमान कंपनी, विमान क्रमांक आणि प्रवासाचा मार्ग याबाबतची माहिती सावंत यांना अपेक्षित होती. याशिवाय दौऱ्यासाठी किती खर्च आला आणि कोणत्या माध्यमातून तो खर्च करण्यात आला? दौऱ्यासाठी आवश्यक असलेली परवानगी कोणाकडून मिळाली आणि त्यासंदर्भातील कागदपत्रे, दौऱ्यामुळे काय अपेक्षित होते आणि त्याचा काय परिणाम झाला? माहिती अधिकार (आरटीआय) कायदा, २००५ च्या अंतर्गत ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे, जर माहिती मिळाली नाही, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील दाखल करू शकतात.

**स्वतंत्र पूर्वपरवानगी अनिवार्य**

जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांनी केवळ एका अधिकाऱ्याचा अर्जीत रजेचा अर्ज उपलब्ध करून दिला. रजेच्या कालावधीत या अधिकाऱ्याने यूएईमध्ये (दुबई) वास्तव्य केल्याचे नमूद केले आहे. शासन परिपत्रकानुसार अशा खासगी दौऱ्यांकरिता संबंधित अधिकाऱ्याने मुख्यालय सोडण्याची पूर्वपरवानगी व सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक आहे. परंतु, या परवानग्यांची कोणतीही माहिती सावंत यांना दिलेली नाही. सावंत यांच्या म्हणण्यानुसार, सरकारी अधिकाऱ्यांना रजा मंजुरी मिळाल्याने परदेश दौऱ्यासाठी आवश्यक असणारी पूर्वपरवानगी समजली जात नाही. परदेश दौरा करण्यासाठी रजा मंजुरी म्हणजे फक्त जबाबदारीतून अनुपस्थित राहण्याची शासकीय परवानगी असते. परंतु, परदेशात जाण्यासाठी स्वतंत्र पूर्वपरवानगी अनिवार्य आहे.

**अधिकाऱ्यांचे परदेश दौरे चर्चेत**

रजा म्हणजे सक्षम अधिकाऱ्याच्या मंजुरीने कामावर अनुपस्थित राहण्याची अधिकृत परवानगी असते. केवळ रजा मंजूर झाली म्हणजे अधिकारी परदेशात जाऊ शकत नाहीत. परदेश दौऱ्याच्या प्रत्येक प्रस्तावाला वेगळी/स्वतंत्र सुसंगत प्राधिकरणाची पूर्वमान्यता आवश्यक असते. शासन नियम, १९८१ च्या अंतर्गत, रजा मंजुरी ही केवळ अनुपस्थितीची परवानगी असून इतर कोणतीही अतिरिक्त कृत्ये (जसे की परदेश प्रवास किंवा दुसरी नोकरी) करण्यासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक असते. सावंत यांनी केलेल्या अपील अर्जामुळे अधिकाऱ्यांचे परदेश दौरे चर्चेत आले असून प्रशासकीय वर्तुळात यावर खमंग चर्चा सुरू झाली आहे.

## शिरसाटांकडून भ्रष्टाचार

मोर्चा काढण्यात येणार आहे. स्थानिक नागरिकांनी अधिकाधिक संख्येने यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहनही रोहित पवार यांनी केले आहे.

याबाबत रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटीशांना मदत केल्याप्रकरणी नवी मुंबई परिसरातील सुमारे ४ हजार एकरहून अधिक जमीन ब्रिटीशांनी बिवलकर नावाच्या कुटुंबाला दिली होती. नंतरच्या विविध कायदे, नियम आणि निकालानुसार ही जमीन सरकारजमा झाली; परंतु, वेगवेगळ्या प्रकारे गोलमाल करुन ही जमीन परत मिळवण्याचा बिवलकर कुटुंबाने सातत्याने प्रयत्न केला. त्यालाही त्या त्या टप्प्यावर नकार मिळाला; मात्र, विद्यमान मंत्री संजय शिरसाठ यांनी २०२४ मध्ये सिडकोचे अध्यक्ष होताच सगळे नियम बाजूला सारून पहिल्याच बैठकीत यातील सुमारे ५ हजार कोटी रुपये किमतीची १५ एकर जमीन या बिवलकर कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला. ही एकप्रकारे भूमिपुत्रांच्या बाबतीतही गद्दारीच आहे. त्यामुळे बेकायदा पद्धतीने बिवलकर कुटुंबाला दिलेल्या या जमिनीसह राज्यातील अशा प्रकारच्या सर्वच जमिनी सरकारने परत घ्याव्यात आणि मंत्री संजय शिरसाठ यांचा राजीनामा घ्यावा, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.२९६/२०२४

१. श्री. गणेश बळीराम चव्हाण
२. श्री. काशिनाथ बळीराम चव्हाण — अपिलार्थी
रा. भोकरपाडा, पोयंजे, ता. पनवेल, जि. रायगड

**विरुद्ध**

१. मे. नवदूर्गा डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा.
श्री. संजय चंद्रकांत मशिलकर
रा. ३, बी विंग, दुसरा मजला, बाळ स्मृती,
मुरार रोड, मुलुंड (प.)- मुंबई-४०००८०
२. श्री. जयंतीलाल पुंजाभाई पटेल — उत्तरार्थी
रा. सदनिका क्र. ए/३०२, एम्पायर इस्टेट, को.ऑप.हौ.सो.,
प्लॉट क्र.४१/४२, जलवायु विहार फेज २ जवळ, सेक्टर २०, खारघर,
ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२१०

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे भोकरपाडा, ता.पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं.१५/२अ (जुना सर्व्हे नं १५२/२ अ) क्षेत्र १-४०-७ हे.आर. आकार १४०७.०० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपिल क्र.१३२/२०२३, दि. २६/०७/२०२४ मधील आदेशाविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. २२/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/०८/२०२५

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबागकरीता**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे-रीस, तालुका-खालापूर जिल्हा-रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली मिळकत, सदरहू मिळकतीचे गांव नमुना नं.७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार अनुक्रमे १) नारायण नथु जांभळे, २) निर्मला परशुराम जांभळे, ३) सुवर्णा राम कडपे, ४) रेश्मा रमेश लहाने, ५) छाया मुकुंद तळेकर, ६) शोभा महेश म्हात्रे व ७) विनायक परशुराम जांभळे यांचेकडून विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे-रीस, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड**

| सर्व्हे/हिस्सा नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १७२/३ | भोगवटादार वर्ग-१ | ०-४८-६० | ९ =०७ |
| | पोट खराबा | ०-०८-०० | |
| | एकूण | ०-५६-६० | |

सदरहू मिळकतीत वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लिन, पोटगी हक्क, कूळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंन्डन्स नोटीस, मा. दिवाणी न्यायालयाचे जैसे-थे हुकूम अथवा मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर दिवाणी न्यायालयाने दाव्यात अंतिम न्याय-निर्णय अथवा हुकूमनामा पारित केलेला असल्यास, कोणत्याही महसूली न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यास अथवा महसूली न्यायालयाचे मनाई हुकूम अस्तित्वांत असल्यास अगर अंतिम न्याय-निर्णय पारित केलेले असल्यास अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आंत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचेकडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजाविरहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहेत व आमच्या अशिलांचे लाभांतील प्रस्तावित विकसन करारास कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहित धरुन आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर विकसन करार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारांत घेतल्या जाणार नाहीत व त्या आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कृपया यांची नोंद घ्यावी.

ठिकाण:- पनवेल
दिनांक :-१५/०८/२०२५.

सही
**श्री.जगदीश उरणकर**
ॲडव्होकेट हायकोर्ट
ऑफिस:-१०१, आदीत्यप्रज्ञा को.ऑप.हौ.सो.,
गोखले हॉल शेजारी, पनवेल-४१०२०६.
ता.पनवेल, जि.रायगड.

**पनवेल महानगरपालिका**
**पशुवैद्यकीय विभाग**
**कार्यालय- देवाळे तलावाच्यासमोर, गोखले हॉलच्याशेजारी, पनवेल-४१०२०६**

दूरध्वनी कार्यालय- ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. :-०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय :- ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय-०२२-२७४५२३३९
ई-मेल : Panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र.पमपा/पशुवैद्यकीय सेवा/८८३/२०२५-२६ दिनांक :-१८-०८-२०२५

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत लहान मोठ्या प्राण्यांना पशुवैद्यकीय सेवेकरिता आवश्यक असणारी औषधे/औषधी साहित्य व इतर सामग्री खरेदी करणेकामी, इच्छुकांनी सदरचे निविदा दर दि.२८-०८-२०२५ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

**Medicine list**

| Sr.No. | Category | MEDICINE | Tender Unit | Name of Manufacturer | Rate / Unit |
|---|---|---|---|---|---|
| 1 | CAP | ITRACONAZOLE CAP 100 MG | 1 UNIT | | |
| 2 | DROP | EAR DROPS . GENTAMICINE + MICONAZOLE NITRATE+ HYDROCORTISONE | 1 UNIT | | |
| 3 | DROP | EAR DROPS . SALICYLIC ACID+ PHENOXYETHANOL | 1 UNIT | | |
| 4 | DROP | EYE DROPS. MOXIFLOXACIN+ DEXAMETHASONE | 1 UNIT | | |
| 5 | DROP | EYE DROPS. MOXIFLOXACIN+KETOROLAC+ TROMETHAMINE | 1 UNIT | | |
| 6 | IVF | D25 INJ | 1 UNIT | | |
| 7 | IVF | D5 INJ. | 1 UNIT | | |
| 8 | IVF | DNS INJ. | 1 UNIT | | |
| 9 | IVF | MANNITOL INJ 20% W/V | 1 UNIT | | |
| 10 | IVF | NS INJ. | 1 UNIT | | |
| 11 | IVF | RL INJ. | 1 UNIT | | |
| 12 | OIN | WOUND HEAL OINTMENT | 1 UNIT | | |
| 13 | OIN | WOUND HEAL OINTMENT 100 GM | 1 UNIT | | |
| 14 | POW | ALBOMAR POWDER | 1 UNIT | | |
| 15 | POW | ASCAREX POWDER | 1 UNIT | | |
| 16 | POW | MINERAL MIXTURE 1 KG | 1 UNIT | | |
| 17 | POW | NEBASULPH POWDER | 1 UNIT | | |
| 18 | POW | POTASSIUM PERMANGNATE PP | 1 UNIT | | |
| 19 | POW | POVIDONE IODINE 100 GM | 1 UNIT | | |
| 20 | POW | POWDER CEPHALOSPORIN - C (LEXIN ) POULTRY 100 GM | 1 UNIT | | |
| 21 | POW | TETRACYCLINE HCL SOL POWDER 100 GM | 1 UNIT | | |
| 22 | POW | WOUND HEAL DP POWDER | 1 UNIT | | |
| 23 | SOAP | PERMETRIN SOAP | 1 UNIT | | |
| 24 | SURG | APRON DISPOSABLE | 1 UNIT | | |
| 25 | SURG | BANDAGE ROLL | 1 UNIT | | |
| 26 | SURG | CHLORHEXIDINE SOLUTION | 1 UNIT | | |
| 27 | SURG | COTTON ROLL | 1 UNIT | | |
| 28 | SURG | DISINFECTANTS-IODINE | 1 UNIT | | |
| 29 | SURG | DISINFECTANTS- STERILIUM | 1 UNIT | | |
| 30 | SURG | DISPOSABLE NEEDLES 16G | 1 UNIT | | |
| 31 | SURG | DISPOSABLE NEEDLES 18G | 1 UNIT | | |
| 32 | SURG | DISPOSABLE NEEDLES 22G | 1 UNIT | | |
| 33 | SURG | DISPOSABLE NEEDLES 23G | 1 UNIT | | |
| 34 | SURG | DISPOSABLE NEEDLES 24G | 1 UNIT | | |
| 35 | SURG | STERILE GAUZE | 1 UNIT | | |
| 36 | SURG | GAUZE ROLL | 1 UNIT | | |
| 37 | SURG | GLOVES SIZE LARGE | 1 UNIT | | |
| 38 | SURG | GLOVES SIZE MEDIUM | 1 UNIT | | |
| 39 | SURG | GLOVES SIZE SMALL | 1 UNIT | | |
| 40 | SURG | HYDROGEN PEROXIDE | 1 UNIT | | |
| 41 | SURG | IV SETS | 1 UNIT | | |
| 42 | SURG | MASKING TAPE | 1 UNIT | | |
| 43 | SURG | PD GLOVES DISPOSABLE | 1 UNIT | | |
| 44 | SURG | POP BANDAGES (10CM ) | 1 UNIT | | |
| 45 | SURG | SCALP VEIN (BUTTERYFLY NEEDLE ) 22G, | 1 UNIT | | |
| 46 | SURG | SCALP VEIN (BUTTERYFLY NEEDLE ) 23G, | 1 UNIT | | |
| 47 | SURG | SCALP VEIN (BUTTERYFLY NEEDLE ) 24G, | 1 UNIT | | |
| 48 | SURG | veterinary IV (intravenous) catheter | 1 UNIT | | |
| 49 | SURG | Urinary Catheters 4 to 10 French (Fr) | 1 UNIT | | |
| 50 | SURG | SPIRIT ALCOHOL | 1 UNIT | | |
| 51 | SURG | SURGICAL BLADES 20-24 | 1 UNIT | | |
| 52 | SURG | SUTURING MATERIAL CATGUT NO 1 | 1 UNIT | | |
| 53 | SURG | SUTURING MATERIAL VICRYL NO 2 | 1 UNIT | | |
| 54 | SURG | SYRINGES TUBERCULIN | 1 UNIT | | |
| 55 | SURG | SYRINGES 2 ML | 1 UNIT | | |
| 56 | SURG | SYRINGES 20 ML | 1 UNIT | | |
| 57 | SURG | SYRINGES 5 ML | 1 UNIT | | |
| 58 | SURG | SYRINGES 50 ML | 1 UNIT | | |
| 59 | SURG | TINCTURE IODINE 500 ML | 1 UNIT | | |
| 60 | SURG | TOPICURE SPRAY | 1 UNIT | | |
| 61 | SURG | WOUND HEAL DP POWDER | 1 UNIT | | |
| 62 | SURG | WOUND HEAL SPRAY | 1 UNIT | | |
| 63 | SURG | WOUND HEAL SPRAY | 1 UNIT | | |
| 64 | SURG | BLOOD COLLECTION VIAL- PLAIN | 1 UNIT | | |
| 65 | SURG | BLOOD COLLECTION VIAL- EDTA | 1 UNIT | | |
| 66 | SURG | BLOOD COLLECTION VIAL- SODIUM FLORIDE | 1 UNIT | | |
| 67 | SURG | BLOOD COLLECTION VIAL- CITRATE | 1 UNIT | | |
| 68 | SURG | STERILE URINE COLLECTION CONTAINER | 1 UNIT | | |
| 69 | SURG | STOOL COLLECTION CONTAINER | 1 UNIT | | |
| 70 | SURG | STERILE SWABS | 1 UNIT | | |
| 71 | SYP | ALBENDAZOLE SYP. 25MG/ML | 1 UNIT | | |
| 72 | SYP | B-COMLEX SYRUP 500 ML | 1 UNIT | | |
| 73 | SYP | CALCIUM SYP 1 LTR | 1 UNIT | | |
| 74 | SYP | CALCIUM SYP 500 ML | 1 UNIT | | |
| 75 | SYP | LIVERTONIC WITH YEAST 5 LTR | 1 UNIT | | |
| 76 | SYP | MELOXICAM SYRUP | 1 UNIT | | |
| 77 | SYP | PET LIVER TONIC 200 ML | 1 UNIT | | |
| 78 | SYP | PRAZIQUANTEL + PYARANTLE PAMOATE + FENBENDAZOLE SYRUP | 1 UNIT | | |
| 79 | SYP | VIMERAL SYP 500 ML | 1 UNIT | | |
| 80 | SYP | VIMERAL SYP 60 ML | 1 UNIT | | |
| 81 | TAB | ALBENDAZOLE TAB 250 MG | 1 UNIT | | |
| 82 | TAB | AZITHROMYCIN 250 MG | 1 UNIT | | |
| 83 | TAB | CETRAZINE TAB 5MG | 1 UNIT | | |
| 84 | TAB | CLINDAMYCIN TAB 150MG | 1 UNIT | | |
| 85 | TAB | DOXYCYCLINE TAB 10 MG | 1 UNIT | | |
| 86 | TAB | DOXYCYCLINE TAB 20 MG | 1 UNIT | | |
| 87 | TAB | ENROFLOXACIN TAB. 150MG | 1 UNIT | | |
| 88 | TAB | ENROFLOXACIN TAB. 500MG | 1 UNIT | | |
| 89 | TAB | FENBANDAZOLE TAB | 1 UNIT | | |
| 90 | TAB | GABAPENTINE TABLET | 1 UNIT | | |
| 91 | TAB | MELOXICAM BOLUS 100 MG | 1 UNIT | | |
| 92 | TAB | MELOXICAM TAB 2.5MG | 1 UNIT | | |
| 93 | TAB | METRONIDAZOLE 1000 MG +FURAZOLIDONE 500MG +LOPERAMIDE BOLUS | 1 UNIT | | |
| 94 | TAB | MULTIVITAMIN TABLET (Vitamin A, Vitamin D3, Vitamin E, Vitamin B1, Vitamin B2, Vitamin B6, Vitamin B12, Folic Acid, Calcium Pantothenate, Nicotinamide. Calcium, Phosphorus, Iron, Zinc) | 1 UNIT | | |
| 95 | TAB | NIMESULIDE 400MG + PARACETAMOL 1500MG | 1 UNIT | | |
| 96 | TAB | OXYTETRACYCLINE BOLUS 500MG | 1 UNIT | | |
| 97 | TAB | PANTOPRAZOLE TAB 10 MG | 1 UNIT | | |
| 98 | TAB | PRAZIQUANTEL + PYARANTLE PAMOATE + FENBENDAZOLE TAB | 1 UNIT | | |
| 99 | TAB | PROBIOTIC, AMINO ACID & LIVER EXTRACT BOLUS | 1 UNIT | | |
| 100 | TAB | SULPHADIMIDINE BOLUS 500 MG | 1 UNIT | | |
| 101 | TAB | TAB. OXYCLOZANIDE, LEVAMISOLE, SILYMARIN , CALCIUM, PHOSPOROUS, VIT D3,E,H | 1 UNIT | | |
| 102 | VIAL | ACYCLOVIR INJ 250 MG | 1 UNIT | | |
| 103 | VIAL | ADRENOCHROME MONOSEMICARBAZONE INJ 5 MG | 1 UNIT | | |
| 104 | VIAL | AMIKACIN INJ. 250MG/ML | 1 UNIT | | |
| 105 | VIAL | AMOXICILLIN+ SULBACTAM 4.5 G | 1 UNIT | | |
| 106 | VIAL | ANALGIN INJ 100 ML | 1 UNIT | | |
| 107 | VIAL | ASCORBIC ACID INJ. 125MG/ML 100 ML | 1 UNIT | | |
| 108 | VIAL | ATRO-P INJETION 100 ML | 1 UNIT | | |
| 109 | VIAL | ATROPINE SULPHATE INJ. 1 MG /ML | 1 UNIT | | |
| 110 | VIAL | B- COMPLEX WITH LIVER EXTRACT INJ. | 1 UNIT | | |
| 111 | VIAL | BOTROPASE INJ. 1 CU/ML | 1 UNIT | | |
| 112 | VIAL | BUPARVACONE 5 % INJ | 1 UNIT | | |
| 113 | VIAL | CALCIUM GLUCONATE 10 % INJ | 1 UNIT | | |
| 114 | VIAL | CHLORPHENARMINE MALEATE NJ. 22.75 MG/ML | 1 UNIT | | |
| 115 | VIAL | DEXAMETHASONE INJ. 2 MG/ML | 1 UNIT | | |
| 116 | VIAL | DIAZEPAM INJ. 5 MG/ML 10 ML | 1 UNIT | | |
| 117 | VIAL | DIMINAZINE ACETURATE INJ. 7% (BERENIL ) | 1 UNIT | | |
| 118 | VIAL | DOXYCYCLINE INJ 100 ML | 1 UNIT | | |
| 119 | VIAL | ENROFLOXACIN INJ. 100 MG/ML | 1 UNIT | | |
| 120 | VIAL | ETHAMSYLATE INJ. 125 MG | 1 UNIT | | |
| 121 | VIAL | FLUNIXINE INJECTION 50 MG/ML 100 ML | 1 UNIT | | |
| 122 | VIAL | FURESAMIDE INJ. | 1 UNIT | | |
| 123 | VIAL | GENTAMYCIN INJ 40 MG/ML 100 ML | 1 UNIT | | |
| 124 | VIAL | HISTAMINE INJ. 100 ML | 1 UNIT | | |
| 125 | VIAL | HUMAN ANTI RABIES IMMUNIGLOBULIN SERUM 300 IU/ ML - 10 ML VIAL | 1 UNIT | | |
| 126 | VIAL | IMIDOCARB DIPROPIONATE 12% W/V | 1 UNIT | | |
| 127 | VIAL | INJ. STREPTOPENECILLIN | 1 UNIT | | |
| 128 | VIAL | INTAMOX 4.5 GM INJ. | 1 UNIT | | |
| 129 | VIAL | IRON DEXTRAN INJ. | 1 UNIT | | |
| 130 | VIAL | ISOFLUDPREDONE ACETATE | 1 UNIT | | |
| 131 | VIAL | IVERMECTINE INJ. 10 MG 100 ML | 1 UNIT | | |
| 132 | VIAL | KETAMINE INJ. 200 MG/ML 10 ML | 1 UNIT | | |
| 133 | VIAL | MELOXICAM INJ 100 ML | 1 UNIT | | |
| 134 | VIAL | MELOXICAM INJ 5MG/ML | 1 UNIT | | |
| 135 | VIAL | MELOXICAM PLUS INJ 100 ML | 1 UNIT | | |
| 136 | VIAL | MELOXICAM PLUS PARACETAMOLE INJ | 1 UNIT | | |
| 137 | VIAL | METACLOPRAMIDE HYDROCLORIDE (PERINORM) INJ 5 MG | 1 UNIT | | |
| 138 | VIAL | METRONIDAZOLE INJ. | 1 UNIT | | |
| 139 | VIAL | NEUROBION INJ. | 1 UNIT | | |
| 140 | VIAL | NIMESULIDE + PARACETAMOL 100 ML | 1 UNIT | | |
| 141 | VIAL | ONDENSETRONE INJ. 2 MG/ML | 1 UNIT | | |
| 142 | VIAL | PREDNISALONE INJ. 10 MG | 1 UNIT | | |
| 143 | VIAL | PROPOFOL INJ 1% W/V | 1 UNIT | | |
| 144 | VIAL | QUINAPYRAMINE SULPHATE 2.5 G | 1 UNIT | | |
| 145 | VIAL | RANITIDINE INJ. 25MG/ML | 1 UNIT | | |
| 146 | VIAL | SODIUM BICARBONATE INJ (8.2%, 1 mEq/ml) | 1 UNIT | | |
| 147 | VIAL | STREPTOPENICILLIN INJ 2.5 GM VIALS | 1 UNIT | | |
| 148 | VIAL | SULPHADIMIDINE INJ. 333.3 W/V PER 100 ML | 1 UNIT | | |
| 149 | VIAL | TRANEXAMIC ACID 100 MG 10 ML | 1 UNIT | | |
| 150 | VIAL | TRIFLUPROMAZINE HYDROCHLORIDE (SEQUIL) INJ. 20 MG/ML | 1 UNIT | | |
| 151 | VIAL | TYLOSINE TARTARATE INJ 200MG 100 ML | 1 UNIT | | |
| 152 | VIAL | VETADE INJ. | 1 UNIT | | |
| 153 | VIAL | VITAMIN- B COMPLEX 100 ML | 1 UNIT | | |
| 154 | VIAL | XYLAZINE INJ. 2 % | 1 UNIT | | |
| 155 | VIAL | Naloxone HCL 0.4 mg/ml | 1 UNIT | | |
| 156 | VIAL | Lidocaine HCL 20 mg/ml | 1 UNIT | | |
| 157 | VIAL | Epinephrine (Low) 1 mg/ml | 1 UNIT | | |

**या कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र
२. पॅनकार्ड (संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे)
३. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे वाहतूक खर्चासह समाविष्ठ असावेत.
४. सदरची जाहीर सूचना फक्त दर खात्री करणेकरीता मागविणेत येत आहे.
५. या कामी काही माहिती हवी असलेस पशुवैद्यकीय विभागाकडे संपर्क साधावा.
६. या कामी दरांची खात्री झालेनंतर जाहीर ई-निविदा मागविणेत येईल.
७. प्राप्त जाहीर निविदा सूचना दर स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निविदा समितीला असतील.

**सही/-**
**मा.उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# रायगड जिल्ह्यात पावसाचा कहर

## शेतीसह अनेक रस्ते पाण्याखाली | बाजारपेठांमध्ये पाणी घुसल्याने हानी | जनजीवन विस्कळीत; गावांचा संपर्क तुटला

**रायगड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना तुफानी पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर बाजारपेठांमध्ये पाणी घुसल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतीसह विविध ठिकाणचे रस्ते पाण्याखाली गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. नद्या-नाले ओसंडून वाहात असून, नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने अनेक ठिकाणी भीतीचे वातावरण आहे.**



● अंबा नदी धोक्याच्या पातळीवर. (छायाचित्र : महेश पवार)

## नागोठण्याला पुराचा धोका

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

यावर्षीच्या पावसाळ्यात अंबा नदीला दोन वेळा पूर आला होता. या दोन्ही पुराच्या वेळी जनजीवन व येथील एस.टी. वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती. त्यातच नागोठणे शहर व परिसरात गेले दोन-तीन दिवस मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे अंबा नदी पुन्हा एकदा तुडुंब भरून वाहण्यास सुरुवात झाली आहे. सोमवारी (दि.१८) दुपारपर्यंत अंबा नदीने धोक्याची पातळी गाठली नव्हती. मात्र, असे असले तरी सोमवारी दुपारी नागोठणे एस.टी. स्थानकाच्या मागील बाजूस अंबा नदीचे पाणी आले होते. तर अजूनही पावसाचा जोरही कायम असल्याने नागोठण्यात कधीही पुन्हा पूर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंत्रणेने नागरिकांना व दुकानदारांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.



● अलिबाग तालुक्यातील झिराडपाडा गावात पुराचे पाणी शिरले असून, असाच पाऊस सुरु राहिला तर घरात पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

## रानबाजिरे धरणाने गाठली धोका पातळी

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पावसाची नोंद दररोज शंभरीपार करीत असल्याने यंदा गणेशोत्सवापूर्वीच पोलादपूर तालुक्यातील सरासरी पावसाची नोंद तीन हजार पार झाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील धरणातील पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीपर्यंत सोमवारी दुपारी तीन वाजता पोहोचण्याची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दरडप्रवण व पूररेषेखालील लोकवस्त्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

तालुक्यातील सावित्री नदीपात्रावरील देवळे येथील धरण पूर्णपणे उखडून काढण्यात आल्यानंतर नदीच्या प्रवाहावर केवळ पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे एकमेव धरण असून, या धरणामध्ये देवळे धरणापासून यंदा मोठ्या प्रमाणात गाळ व लाल माती वाहून आल्याने धरणाचा गाळ अधिक झाला आहे. अशातच यंदा मे महिन्यापासून अवकाळी पावसासोबतच मान्सूनने आगमन केल्याने धरणाच्या बॅकवॉटरचा विसर्ग करण्यात आला नव्हता.

या धरणाची लांबी ३२० मीटर्स असून, सांडवा १२१.८४ मीटर्स आहे. ८ सांडव्यांवरील दरवाजे १२ मीटर्सचे प्रत्येकी आहेत. उच्चालक मोटर क्षमता १० अश्वशक्ती आहे. धरणाची क्षमता ४० मे.टन आहे. पाणीसाठा ६१.५० मीटर पातळीवर २९.९५ द.घ.मी. तर ५५ मीटर पातळीवर १६.४९ दशलक्ष घनमीटर असतो. मृतसाठा ३.६ दशलक्ष घनमीटर असून, ६१.५० पातळीवर वापरण्यायोग्य पाणीसाठा २६.३२ दशलक्ष घनमीटर आणि ५५ मीटर पातळीवर पूर्ण संचय पातळी ६१.५० मीटर आहे. सांडव्यांची पातळी ५५ मीटर आहे. भिंतींची पातळी ६४.७० मीटर, तर धरणाची महत्तम उंची ३३.६१५ मीटर आहे.

## आंबेवाडी नाक्यावर पूरस्थिती



### व्यावसायिकांच्या दुकानात पाणी शिरून मोठे नुकसान

**| कोलाड | प्रतिनिधी |**

संततधार पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे आंबेवाडी बाजारपेठेत तसेच रोह्याकडे जाणाऱ्या द.ग. तटकरे चौकात पाणीच पाणी साचून पूरस्थिती निर्माण झाली आहे. या पुराचे पाणी व्यावसायिकांच्या दुकानात शिरूर व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच यामधून मार्ग काढताना वाहचालकांसहित प्रवासी नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. याला जबाबदार संबंधित ठेकेदार असल्याचे बोलले जात आहे.

गणेशोत्सव आठ दिवसांवर आला असून, यामुळे आंबेवाडी येथील व्यापारी वर्गाने आपल्या दुकानात माल भरून ठेवला आहे. परंतु, दोन दिवस सतत पडत असलेल्या तुफान पावसामुळे पूरस्थिती निर्माण होऊन पुराचे पाणी दुकानात शिरून व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

## श्रीवर्धनमध्ये जनजीवन विस्कळीत

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

तालुक्यात गेले काही दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. परंतु, रविवार (दि.१७) मध्यरात्रीपासून वादळी वारे व मुसळधार पावसाला सुरुवात झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले.

भातपिकाची लावणी योग्य वेळेत झाल्याने या पावसाचा भातपिकाला काही धोका नाही, असे शेतकर्यांनी सांगितले. तर श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी आपत्कालीन दुर्घटनेचा संभव असल्याने पोलीस यंत्रणा अलर्ट करण्यात आलेली आहे आणि पोलीस अधिकारी व अंमलदार आपापल्या बीटमध्ये सतर्क गस्त करीत आहेत, असे सांगितले.



● (छायाचित्र : समीर रिसबूड)

श्रीवर्धन तालुक्यात रविवारी मध्यरात्रीपासून वादळी वारे तसेच मुसळधार पावसाने विद्युत वाहक तारांवर झाडांच्या फांद्या पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी आल्याने जनजीवन विस्कळीत झाल्याचे पहावयास मिळाले. श्रीवर्धन दिघी तसेच श्रीवर्धन म्हसळा मार्गावर अनेक ठिकाणी पाणी साठल्याने काही काळ एसटी सेवा ठप्प झाली होती. पावसाची तीव्रता बघता स्थानिक प्रशासनाने महाविद्यालये व शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय घेतला. इंटरनेट सेवा कोलमडल्याने शासकीय कार्यालय तसेच बँकांमध्ये शुकशुकाट होता. वीजपुरवठा खंडित झाल्याने झेरॉक्स चालक व आईस्क्रीम पार्लर चालकांना आर्थिक फटका बसला. सुदैवाने आपत्तीजनक परिस्थिती तसेच जीवितहानी झालेली नाही.

## महामार्गावर जखमी अवस्थेत मगर

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात मागील दोन-तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. या मुसळधार पावसाचा फटका वन्यजीवांना बसत आहे. रविवारी (दि.१७) रात्री मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव येथील राऊत सर्जिकल हॉस्पिटलच्या समोर जखमी अवस्थेत मगर आढळून आली. एका नागरिकाने ही मगर मुंबई गोवा महामार्गाच्या शेजारील साठलेल्या पाण्याच्या डबक्यात पाहिली. त्याने स्थानिक वन्यजीव रक्षक शंतनू कुवेसकर यांना याची माहिती दिली. त्यांनी वनविभाग व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ संस्थेचे सदस्यांना लागलीच ही माहिती दिली. वनविभाग व वन्यजीव रक्षक यांनी मगरीला रात्री दहा वाजता सुरक्षित पकडले.

## राजपुरी रस्त्यावर मोठा दगड



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

गेल्या चार दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे मुरुड तालुक्यातील मुरुड ते राजपुरी रस्त्यावर डोंगरी ते राजपुरीदरम्यान डोंगरावरून भला मोठा दगड रस्त्यावर पडला. सुदैवाने जीवित व वित्तहानी झाली नाही.

या रस्त्यावर यापूर्वीदेखील डोंगरावरुन रस्त्यावर दगड पडण्याच्या घटना घडल्या आहेत. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी या रस्त्यावर पर्यटकांची वर्दळ असते. नुकत्याच स्वातंत्र्यदिन, गोकुळाष्टमी, शुक्रवार, शनिवार, रविवार अशी सलग सुट्टी आल्याने तीन दिवस रस्त्यावर ये-जा करणाऱ्यांची रेलचेल होती. राजपुरी रस्त्यावर मोठा दगड पडला असल्याचे समजताच सार्वजनिक बांधकाम खात्याचे सहाय्यक अभियंता रोशन पाटील यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन जेसीबीच्या सहाय्याने दगड हटविण्यात येऊन वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे.

## तालुक्यात पावसाची दमदार हजेरी

**| तळा | प्रतिनिधी |**

गेल्या तीन दिवसांपासून रिमझिम कोसळणाऱ्या पावसाने सोमवारी मुसळधार कोसळत तळा तालुक्याला झोडपले. यामुळे तालुक्यातील नद्यांच्या पातळीत वाढ झाली असून, प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पावसाचा जोर असाच कायम राहिल्यास तालुक्यातील नद्यांना पूर येऊन गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच पुलावरून पाणी जात असल्यास पुलावरून प्रवास



करू नये, नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, घरामध्ये पाणी शिरून पाण्याची पातळी वाढत असल्यास तात्काळ घर सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, आपल्या पाळीव प्राण्यांना अगोदरच सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे, मुसळधार पावसामुळे घराच्या आजूबाजूला विजेचे खांब, विद्युत वाहिनी, झाडे पडण्याची शक्यता असल्याने अशा गोष्टींपासून लांब राहावे तसेच आपत्कालीन मदत आवश्यक असल्यास ग्रामपंचायत, नगरपंचायत किंवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनदेखील करण्यात आले आहे. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## रस्त्यांवर पाणीच पाणी; सिडकोविरोधात संताप

**| पनवेल | प्रतिनिधी |**

यंदाच्या पावसामध्ये सिडकोच्या ढिसाळ कारभाराचा फटका नव्याने विकसित होत असलेल्या करंजाडे चिंचपाडा परस्टाईल नागरिकांना बसला असून, यासंदर्भात जनहित सामाजिक संस्थेचे सचिन केणी यांनी संताप व्यक्त केला आहे.

यासंदर्भात त्यांनी मार्च महिन्यातच सिडकोचे कार्यकारी अभियंता यांना पत्र लिहून येथील समस्यांचे निराकरण करण्याची मागणी केली होती. या पत्रात त्यांनी करंजाडे सेक्टर १ व २ येथील मोठ्या नाल्यामधून मधून पावसाळी पाण्याचे निचरा सुरळीतपणे होत नसल्याने सदर ओढ्याचे काम तात्काळ सुरू करावे, त्याचप्रमाणे इतरही विभागाची पाहणी करून ओढ्यामधील पाणी बाहेर काढून त्याची लेव्हल करावी, अशी मागणी केली होती. परंतु, या कामाकडे सिडकोने अजूनही गांभीर्याने न पाहिल्याबद्दल येथील रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. त्यामुळे करंजाडे चिंचपाडा परिसरात पाणी साचले आहे



## पनवेलमध्ये पावसाचे थैमान

**| पनवेल | प्रतिनिधी |**

गेल्या २४ तासांहून जास्त काळ पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पानवेलकरांचे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते. अनेक चाकरमान्यांचे सोमवारी सकाळी कामावर जाताना चांगलेच हाल झाल्याचे चित्र दिसत होते.

पनवेल शहरासह नवीन पनवेल, कारंजाडे, कामोठे, कळंबोली, खांदा वसाहत, खारघर आदी भागातील सखल भागात पाणी साचले होते. त्यातच रस्त्यांना असलेल्या खड्ड्यांमुळे वाहने हळूवारपणे चालत होती. कारंजाडे मध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. येथील ओढा नाला हा कमी रुंदी व उथळ असल्याने यंदाच्यावेळी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने प्रमाण वाढले होते. याचा त्रास येथील रहिवाश्याना होताना दिसत होते. अनेकांनी कामावर जाण्यापेक्षा घरी राहणेच पसंत केले. अनेक दुकानात व तळ मजल्यावर असलेल्या घरांमध्येसुद्धा पाणी साचले होते. एसटी बसेस, एनएमएमटी बसेस उशिराने रस्त्यावर धावत होत्या.

## महाड तालुक्यात धोक्याचा भोंगा वाजला

**| महाड | प्रतिनिधी |**

गेली दोन दिवस कोसळणाऱ्या पावसाचा जोर आज वाढला असून, या मुसळधार पावसामुळे तालुक्यामध्ये पूरजन्यस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे नागरिकांमध्ये एकच घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील सर्वच नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे.



### ■ सावित्री, गांधारी, काळ नद्यांनी गाठली इशारा पातळी

गेली दोन दिवस या संततधार पावसामुळे महाड तालुक्यातील सावित्री, गांधारी, काळ या नद्या उफाळून वाहू लागल्या आहेत. यामुळे महाड तालुक्यातील काही रस्ते पाण्याखाली गेले आहेत. पुलांवरून वाहणाऱ्या पाण्यामुळे गावांचा संपर्कदेखील तुटला आहे. शहरातील गांधारी पूलदेखील पाण्याखाली गेला असून, येथील रस्ता बंद करण्यात आला आहे. दस्तुरी नाका ते नातेखिंड हा रस्तादेखील पाण्याखाली गेल्यामुळे वाहतुकीस बंद ठेवण्यात आला आहे. त्याचप्रमाणे महाड रायगड रस्त्यावरील वाहतूक बंद झाली होती. सांदोशी गावाजवळदेखील पुलावरून पाणी गेले. तालुक्यातील अनेक शाळादेखील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव अर्ध्यातून सोडण्यात आल्या.

## आयोगाची बेहद्द लाचारी

राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपाला निवडणूक आयोगाने दिलेले उत्तर म्हणजे लाचारीचा कळस आहे. आयोगासारख्या घटनात्मक संस्थेवर अशा रीतीने टीका करणे कोणालाही आवडणारे नाही. पण आयोगानेही आपला आब राखला पाहिजे. आयोगाने रविवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी तो पाळला नाही व मोदी सरकारची जी हुजुरगिरी केली. बंगळुरुच्या महादेवपुरा मतदारसंघामध्ये चार-पाच रीतीने मतचोरी झाली असा राहुल यांचा दावा आहे. त्यासाठी आयोगाने दिलेल्या मतदारयाद्यांचाच गठ्ठा त्यांनी दाखवला व गेल्या सहा महिन्यांमध्ये त्याचे विश्लेषण केले असे सांगितले. एकाच मतदाराची अनेकदा नोंद असणे, एकेका पत्त्यावर ५० ते १०० माणसे राहतात असे दाखवणे, फोटो, पत्ते यात गडबड असणे आणि ७० ते ९० वर्षे वयाच्या म्हाताऱ्यांची पहिल्यांदाच मतदान करणारे मतदार म्हणून नोंद करणे असे प्रकार राहुल यांनी सर्वांना दाखवले. असे सर्व मिळून सुमारे एक लाख बोगस मतदार आहेत असे राहुल यांचे म्हणणे आहे. हे सगळेच मतदार बोगस आहेत किंवा प्रत्येक वेळी एकाहून अधिक ठिकाणी मतदारांनी मतदान केले आहे किंवा ही सर्व मते भाजपला गेली आहेत इत्यादी दाव्यांची पडताळणी कठीण आहे. राहुल यांचा तो दावा थोडा अतिशियोक्त म्हणता येऊ शकेल. पण यादीमध्ये मुळात ज्या भानगडी झाल्या त्या खोट्या आहेत असे सहजी म्हणता येत नाही. याची चौकशी करू व नेमक्या कुठे वा का चुका झाल्या हे शोधून काढू असे आयोग पहिल्याप्रथमच म्हणाल असता तर पुढच्या या वादविवादाचा प्रश्न निर्माण झाला नसता. पण आपली काही चूक होऊच शकत नाही हा नरेंद्र मोदी यांचा तोरा आयोगामध्येही उतरलेला दिसतो. राहुल यांनी सादर केलेली आकडेवारी वा तपशील आयोगाने दिलेला नाही असा नरो वा कुंजरो वा पध्दतीचा दावा करून आयोगाने आपली सर्व प्रतिष्ठा धुळीला मिळवली आहे. राहुल यांनी माहिती सादर करताना नेमक्या काय चुका केल्या आहेत याचा खुलासा आयोगाने केला असता व प्रत्येक मुद्दा खोडून काढला असता तरच आयोगाच्या म्हणण्यावर विश्वास ठेवता आला असता.

### भाजपला नोटीस नाही

तसे काही न करता आयोगाने आपला पूर्वीचाच जबाब पुन्हा दिला. राहुल यांचे नाव त्यांनी घेतले नाही. पण आरोप करणाऱ्यांनी सात दिवसांच्या आत पुरावे द्यावे वा माफी मागावी असा तथाकथित दम आयोगाने भरला. यातही निवडणूक आयोगाचे आयुक्त ग्यानेश कुमार यांची चापलुसी अशी की, त्यांनी राहुल यांच्यावर नाव न घेता हल्ला चढवला. यापूर्वीच आयोगाने राहुल यांना नोटिसही देऊन झाली आहे. राहुल यांचे म्हणणे खोडून काढण्यासाठी भाजपचे अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेऊन राहुल व प्रियांका गांधींच्या मतदारसंघांमध्ये असेच बोगस मतदार आहेत असा आरोप केला. गंमत अशी की, राहुल किंवा काँग्रेस हे कोठेही सत्तेत नाहीत. निवडणूक आयोगाची सर्व सूत्रे सरकारच्या हातात आहेत. अशा स्थितीत ठाकूर यांचे आरोप म्हणजे राहुल यांनी केलेल्या दाव्यांना बळकटी देण्यासारखेच होते. निवडणूक आयोगाने राहुल यांची पत्रकार परिषद चालू असतानाच त्यांना नोटीस दिल्याचे जाहीर केले. पण अनुराग ठाकूर यांची पत्रकार परिषद होऊन आठ दिवस झाले तरी त्यांच्याकडे कोणतीही विचारणा आयोगाने केलेली नाही. इतका धडधडीत पक्षपात स्वातंत्र्योत्तर भारतात एकाही घटनात्मक संस्थेने केला नसेल. डबल मतदान करणारे हुडकून काढण्यासाठी आयोगाने मतदानाच्या वेळचे सीसीटीव्ही फुटेज द्यावे अशी विरोधकांची मागणी होती. पण अलिकडेच नियम बदलून हे फुटेज ४५ दिवसांमध्ये नष्ट केले जाते. शिवाय ते द्यायलाही नकार दिला जातो. याचे ग्यानेश कुमार यांनी दिलेले कारण भयंकर होते. मतदार आयाबहिणींचे फुटेज असे कोणाकडेही कसे सोपवता येऊ शकेल, त्यातून प्रायव्हसीचा भंग होईल असे आयुक्त म्हणाले. ग्यानेश हे आयआयटीमधून इंजिनिअर व हॉर्वर्डमधून पदवी घेतलेले गृहस्थ आहेत. मतदानकेंद्रातले, म्हणजे सार्वजनिक ठिकाणचे फुटेज दिल्याने आयाबहिणींच्या खासगीपणाचा भंग होतो हा तर्क त्यांना कोणत्या विद्यापीठाने शिकवला असावा असा प्रश्न पडतो.

### या आयुक्तांना काढा

एकूण इतक्या पक्षपाती व आक्षेपार्ह तर्क देणाऱ्या ग्यानेश कुमार यांना पदावरून काढावे अशीच मागणी विरोधकांनी करायला हवी. कारण. ते जोवर आहेत तोवर निवडणूक आयोग तटस्थ कारभार करेल असे वाटत नाही. आयोगाने बिहारमध्ये जे चालवले आहे त्याचाही काल पंचनामा झाला व त्यालाही आयुक्तांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. मतदारयाद्यांमध्ये गडबडी असल्याने त्या शुद्ध करण्यासाठी बिहारमध्ये याद्यांची व्यापक पडताळणी हाती घेतली असल्याचे ग्यानेशकुमार म्हणाले. कर्नाटकात व इतरत्र राहुल यांचा हाच तर मुद्दा आहे. याद्यांमध्ये मोठ्या गफलती आहेत व भाजपचा फायदा करून देण्यासाठी त्या मुद्दाम केल्या गेल्या आहेत का हा राहुल व विरोधकांचा प्रश्न आहे. तो विचारणे हा करोडो प्रामाणिक मतदारांचा अपमान आहे असा दावा ग्यानेशकुमार यांनी केला. याद्या निर्दोष असणे ही आयोगाची जबाबदारी आहे. त्या नसतील तर त्या त्रुटी दाखवून देणे ही राजकीय नेते व कार्यकर्ते यांची जबाबदारी आहे. हे नेते प्रामाणिक मतदारांविषयी कोठेही शंका घेत नाहीत व त्यांची नावे काढून टाका असेही म्हणत नाहीत. गंमत अशी की, बिहारमध्ये राहुलने नव्हे तर आयोगाने हे केले आहे. त्यांनी ६५ लाख मतदारांची नावे वगळली आहेत. शिवाय करोडो मतदारांना नव्याने अशक्य असे पुरावे सादर करायला सांगितले आहे. बिहारमध्ये सध्या जागोजाग पूर आले आहेत. तरीही आयोगाला पंधरा दिवसात हे सर्व करायचे आहे. या घाईगडबडीला विरोध केला तर मतदारयाद्यातील चुका काढायलाच विरोधक विरोध करीत आहेत असा खोटा आरोप आयोग करीत आहे. आपल्या लोकशीही देशामध्ये हे सर्व काय चालू आहे असे कोणालाही प्रश्न पडेल. याला खरे तर सर्वोच्च न्यायालयाने चाप लावण्याची गरज होती. पण आश्चर्यकारक रीत्या त्यांनीही यात हस्तक्षेप करण्याचे टाळले. बिहार किंवा देशात कुठेही मतदारयाद्या बिनचूक असाव्यात असेच सर्वांचे म्हणणे आहे. मात्र बिहारमध्ये गुपचूप एक सरकारी आदेश काढून आठ कोटी लोकांच्या नावांच्या परीक्षणाचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. यामध्ये कोणत्याही राजकीय पक्षांना विश्वासात घेण्यात आले नाही. सरकारी यंत्रणेला कोणतेही पूर्वप्रशिक्षण दिले गेले नाही. त्यामुळे अनेक जिवंत माणसांना मेलेले तर मेलेल्यांना जिवंत दाखवणारी बिहारची यादी प्रसिद्ध झाली आहे. जूनमध्ये हा निर्णय झाला. पण त्याबाबत खुलासा करावा असे निवडणूक आयोगाला दोन महिन्यांमध्ये काही वाटले नाही. आता राहुल यांच्या आरोपांमुळे सरकार अडचणीत आल्यावर आयोग त्यांच्या मदतीसाठी सरसावला. हे लाजिरवाणे आहे.

**विचार**

# ग्रामीण भागाची नस ओळखा

*आजचा ग्रामीण भाग गुन्हेगारी, भ्रष्टाचार, आरक्षणासाठीची आंदोलने, धार्मिकता, महापुरुषांसंबंधीच्या आक्षेपार्ह पोस्ट यामुळे गाजत आहे. याला वळसा घालून पोटापाण्याचे, विकासाचे मुद्दे डोळ्यासमोर ठेवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व्हायला हव्यात. राजकीय पक्षांनी आपले जाहीरनामे अतिशय दूरदृष्टीचे, व्यापक आणि सर्वस्पर्शी ठेवायला हवेत. तरच परिस्थितीला नवे वळण्याची अपेक्षा ठेवता येईल.*



**प्रा. जयदेव डोळे**

आज ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक जीवनातील सर्व महत्त्वपूर्ण कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांशी जोडलेला आहे. शेती, शिक्षण, आरोग्य असो वा घरे; अथवा अनुदान मिळवण्याच्या योजनांचे लाभ घेण्यासाठी त्यांना या संस्थांचे सहकार्य अपेक्षित असते. आज प्रत्येक जिल्ह्याचे पालकमंत्रीपद घेण्यासाठी तीनही पक्षांचे सत्ताधारी अत्यंत उत्सुक दिसतात. एक-दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाचा वाद अजूनही रेंगाळतो आहे. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाच्या किल्ल्या जिल्हा नियोजन समितीच्या हातात असतात. पालकमंत्री डीपीसीसीचा (डिस्ट्रिक्ट प्लॅनिंग कोऑर्डिनेशन कमिटी) अध्यक्ष असतो. त्याच्या सोबतीला त्या जिल्ह्यातील आमदार, खासदार आणि सर्व प्रतिनिधी, नोकरशाही असते. केंद्र आणि राज्य सरकारच्या डझनावारी योजना डीपीसीसीच्या माध्यमातूनच मार्गी लागतात. हे लक्षात घेता आगामी काळात तीनही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते पुढे येतील. पुढील सहा महिन्यांमध्ये त्यांना लोकांची कामे करुन देण्यासाठी संमतीपत्रे, मंजुरी आणि अनुदान यांची बरसात करावी लागणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहे तर गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद खुद्द मुख्यमंत्र्यांकडे आहे. दोघेही अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीचे नेते असल्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांचा लवकरच कायापालट होईल, असा नागरिकांचा विश्वास वाटतो.

असे असले तरी कोणत्याही पंचायत समितीचे उदाहरण घेतले तर आढळते की, ग्रामीण भागातील नागरिकांना तसेच या संस्थांशी निगडित असणाऱ्या लोकांना पुन्हा पुन्हा तेच-तेच प्रश्न भेडसावत असतात. उदाहरणादाखल गृहबांधणीचा एखादा प्रकल्प घेऊ या. मग यात प्रधानमंत्री योजना, रमाई आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना अशा प्रकारचे घरकुलांचे अनेक प्रकल्प आहेत. या सगळ्याचा लाभ घेण्यासाठी परवानग्या आणि अनुदानाची मान्यता मिळवण्यासाठी नागरिकांना पंचायत समित्यांच्या कार्यालयात येरझाऱ्या घालाव्या लागतात. एरवी ही कामे वेळेत होत नाहीत. पण निवडणुका तोंडावर आल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व पुढे येते. म्हणजेच आता दारापाशी, फाटकामध्ये राजकीय पक्षांचे कार्यकर्ते उभे असतात. पंच, सरपंच वा आमदार-खासदार होण्याची इच्छा बाळगणारे लोक योजनांसाठी पात्र ग्रामस्थांची शिष्टमंडळे घेऊन आपल्या अधिकाऱ्यांकडे जातात. प्रसंगी मध्यस्थी अथवा दलाली करतात. यात काही देवाणघेवाणही होत असते. याचा परिणाम असा की नागरिकांमध्ये सरकारी कामे आणि सरकारी योजना मिळवून देणारा माणूस म्हणजे हा राजकीय नेता वा कार्यकर्ता अशी ओळख तयार होते. पण या मार्गाने नोकरशाहीमध्ये दलाल वाढवत नेणे आणि यायोगे आपलीही काही आर्थिक तजवीज करत राहणे अशी दृढ समजूत ग्रामीण भागात वाढते आणि हळूहळू त्या भागातील राजकीय प्रवृत्तीच बदलून जाते. सध्या अनेक भागामध्ये ही विषवल्ली फोफावलेली दिसते. तिचा निपटारा व्हायला हवा. स्थानिक परिसराचा विकास करण्यासाठी आमदार-खासदारांना दोन कोटी रुपयांचा फंड मिळतो. तो आधी उल्लेख केलेल्या डीपीसीसीकडे जातो. तेथे आम्हाला विहीर पाहिजे, घरे पाहिजे, शेततळे वा पाझर तलाव पाहिजे, शाळांच्या खोल्या पाहिजेत अशा स्वरुपाच्या शिफारसी केल्या जातात. असे असताना स्थानिक कार्यकर्ते पालकमंत्री वा आपल्या भागातील आमदार-खासदाराकडून किंवा थेट जिल्हाधिकारी वा तहसीलदारांवर दबाव आणून ही कामे करवून घेतात. पण यात प्राधान्यक्रम असावा की नाही, कोणत्या कामाला प्राथमिकता द्यायची, विनाकारण खर्च होणारे कार्यक्रम हाती घ्यायचे का, फक्त फोटोची संधी देणारे वृक्षलागवडीसारखे कार्यक्रम किती घ्यायचे हा विचारात घेण्याजोगा भाग आहे. कारण ग्रामीण स्वच्छता वा यासारखेच कार्यक्रम करत बसायचे की पायाभूत सुधारणांसाठी आवश्यक असणाऱ्या आरोग्य, शिक्षण, रस्ते, वाहतूक या गोष्टींकडेही लक्ष द्यायचे हे आता ठरवावे लागेल. आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा विचार करता हा महत्त्वाचा प्रश्न म्हणावा लागेल. मुख्य म्हणजे विकास म्हणजे कंत्राटदारी, विकास म्हणजे कमिशनची कामे, विकास म्हणजे टक्केवारी देणारी जबाबदारी ही रुढ झालेली व्याख्या सुधारणे गरजेचे आहे, कारण ती दृढ झाल्यामुळेच महाराष्ट्राचे राजकारण आणि होणाऱ्या निवडणुका सर्वस्वी पैशाच्या, उपकारकर्त्यांच्या आणि जवळच्या लोकांची कामे करणाऱ्यासाठी असतात, हा समज पसरला आहे.

स्वाभाविकच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे मुद्दे राजकीय पक्षांची कसोटी पाहणारे ठरतील. ग्रामीण भागामध्ये उद्योगधंदे आणून, काही प्रक्रिया उद्योग आणून वा आहे त्या शेतीमालापासून वेगळे काही करुन दाखवणे हा अजेंडा समोर ठेवणारे राजकीय पक्ष वा नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये निवडून येणे शक्य आहे का, हा आजचा खरा प्रश्न आहे. माझ्या मते, ही शक्यता आता मावळली आहे. चुकीच्या पद्धतीने इथे सत्ता मिळवता येते हे समजल्यामुळेच आज चांगल्या नोकऱ्या सोडून, संधी सोडून सरपंच म्हणून वा जिल्हा परिषदांमध्ये काम करणाऱ्या तसेच स्वयंसेवी म्हणून काम करणाऱ्यांची संख्या ग्रामीण भागात वाढते आहे. वर्तमानपत्रे त्यांचेच कौतुक करतात. विकास राजकारणातूनच होतो, हे मान्य आहे. त्याबाबत दुमत नाही. पण त्यातील चढाओढ कल्पकतेच्या अंगाने असायला हवी. म्हणजे समाजवादी रचनेचा विकास करायचा की भांडवली पद्धतीचा, शेतकऱ्यांना फायदा देणाऱ्या योजना आणायच्या की उद्योगांना, औद्योगिकतेला लाभ देणाऱ्या योजना आणायच्या हा राजकीय पक्षांचा वैचारिक गाभा असतो.

पण या अर्थाने राजकीय विकास न होता आता वैयक्तिक पातळीवर चार-सहा डझन लोकांभोवती एखाद्या भागाचा विकास कोंडला जात असेल तर चिंता वाढते. कारण यामुळे आधीच्या राज्यकर्त्यांमधील सहकारातून स्वयंस्फुर्तीने आणि सगळ्यांना सामील करुन घेत आपल्या परिसराचा विकास घडवून आणण्याची अपेक्षित असणारी प्रेरणाच संपत चाललेली दिसते. अगदी चांगल्या योजना असल्या तरी त्यातही अपहार, बोगस बिलाच्या अनेक बातम्या आपल्या वाचनात असतात. करोडो रुपये खर्चूनही विविध कल्याणकारी योजनांची कामे होत नसतील तर नागरिकांनी कोणाच्या तोंडाकडे बघावे, हा आताचा आ वासून उभा असणारा प्रश्न आहे. अजित पवार असो वा देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचा झपाटा आणि नेतृत्वक्षमतेबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. पण राजकीय व्यवस्थाच अशी बनली आहे की एखादे खुश करण्याचे काम दिल्यावाचून कार्यकर्ता कामेच पुढे नेत नाही. निश्चिंत, निस्वार्थीपणे आपल्या राजकीय पक्षाच्या धोरणांसाठी काम केले पाहिजे, हा विचारच आता मागे पडला आहे.

तेव्हा आता प्रचाराचे मुद्दे याभोवती केंद्रित झाले पाहिजेत. आजकालचा ग्रामीण भाग गुन्हेगारी, भ्रष्टाचार, आरक्षणासाठीची आंदोलने, धार्मिकता, महापुरुषांसंबंधीच्या आक्षेपार्ह पोस्ट यासाठी गाजत आहे. याला वळसा घालून पोटापाण्याचे, विकासाचे मुद्दे डोळ्यासमोर ठेवून या निवडणुका घेतल्या जायला हव्यात. पालकमंत्री, महसूलमंत्री, आमदार, खासदार असो की राजकीय पक्षांचे अध्यक्ष, या सगळ्यांनीच आपल्या पक्षांचे जाहीरनामे अतिशय दूरदृष्टीचे, व्यापक आणि सर्वस्पर्शी ठेवायला हवेत. दुसरे म्हणजे ग्रामीण भागातील निवडणुकीमध्ये पक्ष बहुतेक वेळा प्रत्यक्षात समोर नसतात. पॅनल अथवा मंडळे असतात. तरीही नंतर आमचे इतके, त्यांचे तितके अशी संख्या पक्ष सांगू लागतात. ताकाला जाऊन भांडे लपवायचा हा प्रकार असतो. सबब पक्षांनी जाहीरनामे आणि आश्वासने स्पष्ट करायला हवीत. तरच छोट्यातील छोट्या राजकीय कार्यकर्त्याच्या पंच वा सरपंच होण्याच्या इच्छांना काही दिशा मिळेल आणि विधायक राजकारणाची खंडित झालेली परंपरा महाराष्ट्रात पुन्हा सुरू होईल.

(शब्दांकन: स्वाती पेशवे)

**चर्चा आजची**

## शेकापच्या दहीहंडीचा बोलबाला

**प्रमोद जाधव**

शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने अलिबाग शहरात व पेझारीमध्ये दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यात आला. मानवी मनोरे उभारून सलामी देणाऱ्या महिला व पुरुष गोविंदा पथकाला बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. शिस्तबद्ध निटनेटके नियोजन, योग्य व्यवस्थापन असलेल्या शेकापच्या दहीहंडीचा बोलबाला रायगड जिल्ह्यात आजही प्रत्येक ठिकाणी आहे. प्रत्यक्ष जागेवर तसेच घरबसल्या केबल व युट्यूबवर लाखो प्रेक्षकांनी या पारंपारिक खेळाचा आनंद लुटला.

अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या पुढाकाराने शेकाप पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. अलिबागमधील शेतकरी भवन समोर हा सोहळा आयोजित करण्यात आला. या दहीहंडी उत्सवाच्या दिवशी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. तरीदेखील शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकांनी गेल्या अनेक वर्षाची परंपरा पाहण्यासाठी अलिबागमध्ये अलोट गर्दी केली होती.डिजेचा ठेका, सुमधूर अशी गाणी, विजेचा झगमगाट, शिस्तबद्ध नियोजन, फुलांनी सजविलेली दहीहंडी, तरुणाईच्या सन्मानाचा तसेच गोविंदा पथकासह उपस्थितांच्या सुरक्षेचा विचार करून अलिबागमध्ये दहीहंडी उभारण्यात आली. उंचावर बांधण्यात आलेली दहीहंडी फुलांनी आणि विद्युत रोषणाईने आकर्षक अशी सजविली होती. त्यामुळे अनेकांनी ही दहीहंडी आपल्या मोबाईलच्या कॅमेरात कैद करण्याचा प्रयत्न केला. काहींनी व्हीडीओ तर काहीं दहीहंडी समवेत सेल्फीचाही आनंद लुटला.

कुलाबा ढोल ताशा व ध्वज पथकामार्फत ढोल ताशांच्या गजरातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवून या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. या सोहळ्यामध्ये एकूण ५३ गोविंदा पथकाने सहभाग घेतला. त्यात २९ पुरुष गोविंदा पथक व २४ महिला गोविंदा पथकाचा समावेश होता.

अलिबागमधील पाचनाका महिला गोविंदा पथकामार्फत दहीहंडी सलामीला सुरुवात झाली. महिला गोविंदा पथकाने चार थरांची सलामी दिल्यास पाच हजार रुपये व पाच थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकाला अकरा हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले होते. यामध्ये १३ महिला गोविंदा पथकांनी चार थरांचे मनोरे उभारून सलामी दिली असून, अकरा गोविंदा पथकांनी पाच थरांचे मानवी मनोरे उभारून सलामी दिली. आला रे आला गोविंदा आला..., शेकापच्या हंडीची वेगळीच हवा... अशा अनेक गोविंदाच्या गाण्यांचा आनंद डिजेवर घेण्यात आला. डिजेच्या ठेक्यावर अनेकजण थिरकले.

अलिबागची ही मानाची दहीहंडी फोडण्याचा मान पुरुषांमध्ये गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकाने, तर महिलांमध्ये पोहरादेवी शास्त्रीनगर-अलिबागच्या गोविंदा पथकाने पटकाविला. गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकाला एक लाख ३१ हजार ,१११ रुपये व मानाची गदा, तर शास्त्रीनगर-अलिबागच्या पोहरादेवी गोविंदा महिला पथकाला ५१ हजार १११ रुपये व मानाची गदा आणि अलिबाग नगरपरिषद हद्दीतील हे पथक असल्याने स्व. नमिता नाईक यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आलेल्या ५० हजारांचे अतिरिक्त पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दोनशेहून अधिक सभासदांनी वेगवेगळी जबाबदारी चोखपणे सांभाळली. त्यासाठी जवळपास १६ विविध पथके तयार करण्यात आली होती. या सभासदांनी प्रथमोपचारापासून दिलेली वेगवेगळी जबाबदारी उत्तमपणे सांभाळून स्पर्धा यशस्वी करण्यात मोलाचा वाटा उचलला. यामध्ये महिला स्वयंसेवकांचेही एक वेगळे पथक याठिकाणी तैनात होते.

चित्रलेखा नृपाल पाटील पुरस्कृत शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना पेझारी व मृदूंग म्हात्रे मित्रमंडळ आयोजित पेझारी येथे दहीहंडीचा उत्सव झाला. आला. प्रशांत नाईक मित्र मंडळाच्या अलिबाग कोळीवाडा गोविंदा पथकाने सात थरांची दहीहंडी फोडून मान मिळविला. या पथकाला ५१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले.

या उत्सवात एकूण ३७ गोविंदा पथकाने सहभाग घेतला होता. त्यात २५ पुरुष गोविंदा पथक व १२ महिला गोविंदा पथकाचा समावेश होता. महिला गोंविदा पथकाला चार थरांची तर पुरुष गोविंदा पथकाने पाच थरांची सलामी होती. अनेक गोविंदा पथकांनी चार ते पाच पेक्षा अधिक थर रचून सलामी दिली. दहीहंडीचा थरार पाहण्यासाठी खारेपाटातील असंख्य प्रेक्षकांनी गर्दी केली होती. मानाचा, प्रतिष्ठेची दहीहंडी सोहळ्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. उत्तम नियोजन, व्यवस्थापनामुळे हा सोहळा उत्साहात पार पडला. शेकापच्या महिला व पुरुष कार्यकर्त्यांचाही मोठा सहभाग यामध्ये होता.

**लोकसंसद**

### अनधिकृत बॅनरबाजीमुळे शहरांचे विद्रुपीकरण

अनधिकृत बॅनरबाजीमुळे शहरांचे विद्रुपीकरण होत असल्यामुळे 'राज्यात कुठेही बेकायदा होर्डिंग, पोस्टर, फलक, झेंडे, बॅनर लागू नयेत, जर असे बेकायदा जाहिरातींचे होर्डिंग, बॅनर कुठेही लागलेच तर राज्यातील सर्व महापालिका, नगरपालिका इत्यादी स्थानिक प्रशासनांनी त्याची दखल घेऊन ते तात्काळ काढून टाकण्याची कारवाई करावी' अशा आशयाचे आदेश अनेकवेळा मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. मात्र न्यायालयीन आदेशाला न जुमानता प्रत्यक्षात राज्यभरात अनधिकृत बॅनर आणि पोस्टरबाजीला उधाण आले आहे. अशावेळी राजकीय पक्षांबरोबरच सण, उत्सवानिमित्त नागरिकांना शुभेच्छा देणाऱ्या स्थानिक स्वयंघोषित समाजसेवकांकडून प्रशासनाची पूर्व परवानगी न घेता बस थांबे, विजेचे खांब, मोठमोठे वृक्ष, इमारती तसेच मिळेल त्या जागी पोस्टर, बॅनर्स आणि होर्डिंग्ज लावले जातात. मुंबई महापालिकेने शहराच्या विविध भागातून गेल्या चार महिन्यात तब्बल २० हजार ३४५ अनधिकृत फलक काढले. अनधिकृत फलक लावून शहरांचे विद्रुपीकरण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होत नसल्याने बॅनरबाजीचे पेव फुटले आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे अनधिकृत बॅनरबाजीला आणखी ऊत येईल. या पार्श्वभूमीवर, उच्च न्यायालयाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार संबंधित स्थानिक प्रशासनांकडून अशा बेकायदा बॅनरबाजीवर योग्य ती कारवाई होईल अशी अपेक्षा आहे. **– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

### असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय चेहरा, ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ज्योती चांदेकर या मराठी रंगभूमीवरील नावाजलेल्या अभिनेत्री होत्या. केवळ रंगभूमीवरच नाही तर चित्रपट आणि दूरचित्रवाहिनीवरील मालिकेतही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. त्यांनी साकारलेली 'ठरलं तर मग' मालिकेतील पूर्णा आजी, मी सिंधुताई सपकाळ या चित्रपटातील सिंधुताई सपकाळ या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. देवा एक अतरंगी या चित्रपटामधील त्यांची भूमिका देखील प्रेक्षकांना भावली. त्यांच्या जाण्याने एक प्रेमळ आई, जिव्हाळ्याची कलाकार, असामान्य अभिनेत्री काळाच्या पडद्याआड गेली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

**दिनविशेष**

## जागतिक छायाचित्र दिन

आजकाल बहुतेक लोकांना त्यांच्या आयुष्याशी संबंधित प्रत्येक अपडेट सोशल मीडियावर शेअर करायला आवडतं. तुम्हाला प्रवास करताना वेगवेगळ्या ठिकाणांची सुंदर छायाचित्रे क्लिक करायला आवडत असतील. प्रत्येकाच्या आयुष्यात फोटो खूप महत्त्वाचे असतात. लोक आपला इतिहास केवळ छायाचित्रांमधूनच पाहत आले आहेत. फोटो प्रत्येकासाठी खास असतात. दरवर्षी १९ ऑगस्ट रोजी छायाचित्रण दिन साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येकासाठीच महत्वाचा आहे. वर्ल्ड फोटोग्राफी डे साजरा करण्याची सुरुवात फ्रान्समध्ये १८३७ मध्ये झाली. फ्रान्सचे जोसेफ निसेफोर आणि लुई डग्युरे यांनी त्यावर्षी १९ ऑगस्ट रोजी याची सुरुवात केली. त्यानंतर तेथील सरकारने हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी १९ ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्रण दिन साजरा केला जातो. आजच्या युगात फोटोग्राफर फोटो काढण्यासाठी एकापेक्षा एक अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या कॅमेऱ्यांचा वापर करतात. याशिवाय फोटो काढण्यासाठी आता प्रत्येकाकडे स्मार्ट फोन आहेत. त्यामुळे आज फोटो काढणे ही गोष्ट खूप सोपी झाली. मात्र, पूर्वी फोटो काढणे खूप कठीण काम होतं. १८३९ मध्ये रॉबर्ट कॉर्नेलियसने आपल्या वडिलांच्या दुकानाचा फोटो काढण्यासाठी कॅमेरा लावला होता. त्यानंतर दुकानाचा फोटो त्यांनी क्लिक केला आणि ३ मिनिटांनी एक फोटो बाहेर आला. त्यानंतर हळूहळू फोटो काढण्याची सुरुवात होऊ लागली. जागतिक छायाचित्रण दिन हा फोटोग्राफीची कला आणि हस्तकला आणि या शैलीबद्दल लोकांमध्ये असलेली उत्कटता साजरी करण्याचा दिवस आहे. ऐतिहासिक घटनांचे दस्तऐवजीकरण करण्यापासून वैयक्तिक पूर्तता आणि स्मरणशक्ती निर्माण करण्यासाठी माध्यमाचा उद्देश कसा विकसित झाला आहे. हे देखील हा दिवस ओळखतो. फोटोग्राफी हा गेल्या दशकभरात अनेक तरुणांनी छंद म्हणून स्वीकारला आहे. याचे श्रेय तांत्रिक उपकरणांमधील प्रगती आणि त्यांच्या वापरातील सुलभतेला दिले जाऊ शकते. १९ ऑगस्टचा हा प्रसंग अधिक महत्त्वाचा ठरतो कारण तो अधिकाधिक लोकांना फोटोग्राफीला व्यवसाय म्हणून स्वीकारण्यासाठी किंवा या क्षेत्रात अधिक स्वारस्य दाखवण्यासाठी प्रेरित करतो. हा दिवस प्रतिभा प्रदर्शित करण्याची आणि कलाकृतींना प्रोत्साहन देण्याची संधी मानली जाते. छायाचित्रण हा छंद किंवा व्यवसाय म्हणून जोपासला जात असला तरी त्यासाठी कलात्मक दृष्टी आवश्यक असते. सध्या व्यावसायिक छायाचित्रकारासाठी मोबाईल स्पर्धक ठरत असल्याचे चित्र आहे. काही वर्षांपूर्वी कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र हातात पडण्यासाठी पंधरा दिवस वाट पाहावी लागत असे. काळ बदलला आणि छायाचित्रणाची माध्यमेही बदलली. रोलचा कॅमेरा, डिजिटल कॅमेरा ते मोबाइल असा हा प्रवास झाला. टिपलेले छायाचित्र काही सेकंदांत पाहता येऊ लागले तरी कलेतील आकर्षण कायम आहे. कॅमेरा धरून बटन दाबले की फोटो येतो. पण, त्यासाठी अगोदर योग्य शटर स्पीड, ॲपारचर, आयएसओ, व्हाईट बॅलन्स, संपूर्ण विषय किंवा त्यावर पडलेली लाईट, फोटोच्या चौकटीमध्ये योग्य पद्धतीने बसवणे व ज्या व्यक्ती किंवा वस्तूचा फोटो काढावया आहे तो विषय समजला पाहिजे. एखाद्याला छायाचित्र कलेची संपूर्ण माहिती आहे म्हणून छायाचित्र चांगला येऊ शकत नाही. चांगला कॅमेरा, चांगली लेन्स असली तरी कॅमेऱ्यामागे संवेनदनशील, कलात्मक दृष्टीचा कॅमेरामन असावा लागतो.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ ऑगस्ट

१) श्री.अशोक प्रभाकर देशमुख
ब्राम्हणआळी, अलिबाग
१९-०८-१९४६

२) श्रीमती. संगीता दामोदर पडते
मु.गुंजीस, अलिबाग
१९-०८-१९४७

३)श्रीमती.आशा आत्माराम प्रधान
ईस्त्राईल-आळी, अलिबाग
१९-०८-१९४१

४)संतोष गजानन गोडबोले
अलिबाग १९-०८-१९६३

५)श्री.श्रीरंग यशवंत गुरव
वरसोली, अलिबाग
१९-०८-१९६१


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**आर्य प्रमोद चौधरी, वाढदिवस**


## सुवर्णकण



श्री वासुदेवानंद सरस्वती म्हणतात संतांच्या सहवासात सदा सर्वदा रहावे त्यांनी उपदेश दिला नाही तरी चालेल कारण त्यांचे सहज बोलणे हाच सर्वांसाठी उपदेश असतो.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

# कोकणवासियांना महामार्ग ठरतोय ‘त्रासमार्ग’

## ● सुट्टीनंतर परतीच्या प्रवासात रखडपट्टी ● वाहनांच्या लांबच लांब रांगा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

**गेल्या चार दिवसांपासून मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असून, माणगाव बाजारपेठ या ठिकाणी तर अक्षरशः गाड्यांचा खच पडला आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन, गोपाळकाला आणि रविवार अशा सलग तीन दिवसांच्या सुट्ट्यांचा आनंद घेऊन हजारो पर्यटक कोकणातून परतीच्या प्रवासाला निघाले. मात्र, या प्रवासाने त्यांना सुट्टीचा आनंद नव्हे तर, प्रचंड त्रास, संताप आणि नाईलाजाचे दर्शन घडवले. तासन्तास रस्त्यावर अडकून राहिलेले पर्यटक व कोकणवासियांची अवस्था दयनीय झाली होती.**



मुसळधार पावसात वाहनात अडकून पडलेले तसेच अन्नाविना अस्वस्थ झालेल्या प्रवाशांची दुरवस्था पाहून प्रशासनाचे उदासीन व राज्यकर्त्यांचे निष्क्रिय धोरण ठळकपणे उघड झाले. त्यामुळे तासन्तास महामार्गावर पर्यटक प्रवासी नागरिक अडकून पडले असून, त्यांची चांगलीच रखडपट्टी झाली. हा कोकणचा महामार्ग सर्वांसाठीच ‘त्रासदायक’ मार्ग बनला आहे.

महामार्गाचे काम तसेच माणगाव व इंदापूरमधील बायपासचे काम मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, हे काम कधी पूर्ण होणार याचा ठावठिकाणा नाही. वेळोवेळी गाजावाजा करून दिलेली आश्वासने केवळ ढगांतील वीज ठरत आहेत. प्रचंड निधी खर्ची घालूनही आजपर्यंत फक्त अपूर्ण व खडबडीत महामार्गच जनतेला मिळाला आहे. गाड्यांचे अपघात, प्रचंड विलंब, रुग्णवाहिकांना होणारा अडथळा यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत. ही केवळ प्रशासनाची नाही, तर शासन व राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाची परिसीमा आहे.

दरवर्षीच्या सुट्ट्या, सण व गर्दीच्या हंगामात महामार्ग जाम होणार हे निश्चितच ठरलेले असते, तरीही उपाययोजना करण्यात शासन व प्रशासन सपशेल अपयशी ठरले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सहनशक्तीचा अंत होत असून, शासनाविरोधात रोष उसळला आहे.

### विकासाच्या नावाखाली फसवणूक

विकासाच्या नावाखाली केलेली फसवणूक व ठोकळेबाज दावे आज उघडे पडले आहेत. कोकणवासीय आणि प्रवासी यांचे प्रश्न कोण सोडवणार, हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. या महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण न केल्यास लोकांच्या संतापाचा ज्वालामुखी राज्यकर्त्यांवर फुटल्याशिवाय राहणार नाही, अशी तिखट प्रतिक्रिया स्थानिक नागरिक व पर्यटक प्रवाशांतून बोलताना व्यक्त केली आहे.

### महामार्ग पूर्ण होणार कधी?

मुंबई-गोवा महामार्गाचे काम तब्बल सतरा वर्षांपासून सुरू असूनही अद्याप अपूर्णच आहे. विशेषतः माणगाव व इंदापूर बायपासचे काम सुरू न झाल्याने या शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. तासन्तास वाहनांच्या रांगा लागत असून, नागरिक व प्रवाशांचा त्रास शिगेला पोहोचला आहे. शासनाच्या ढिलाईमुळे जनतेत संताप उसळला आहे.

# ‘सुवर्णक्रांती’ चा द्वितीय वर्धापनदिन उत्साहात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

सहकार क्षेत्रातील सुवर्णक्रांती अर्बन मल्टिस्टेट निधी लिमिटेड शाखा माणगाव या शाखेचा द्वितीय वर्धापनदिनसोहळाशुक्रवार, दि.१५ ऑगस्ट रोजी संस्थेचे संस्थापक एस. एम. म्हात्रे, संचालक शीतल पंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थापक सुखदेव म्हात्रे यांच्या हस्ते माणगाव शाखेच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त केक कापण्यात आला.



या सोहळ्यात संस्थेचे सर्व शाखाधिकारी तसेच संस्थेच्या उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवरांचे संस्थतर्फे संस्थापक एस.एम. म्हात्रे, संचालक शीतल पंडागळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कामकाजाची माहिती देऊन संस्थेच्या भरभराटीस सहकार्यकरणाऱ्यासर्वांचेमनापासून ऋण व आभार व्यक्त केले. यावेळी संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या सोहळ्याचे प्रास्ताविक संस्थेचे माणगाव शाखाधिकारी राकेश पडवळ यांनी केले. या सोहळ्यास संस्थेचे मोर्बा प्रमुख संदीप सकपाळ, नेरळ खोपोली प्रमुख संदीप वाकले, बदलापूर अंबरनाथ प्रमुख राजेश काठावले, कामोठे प्रमुख सुदाम कानावडे, उरण प्रमुख ज्योत्स्ना म्हात्रे, नेरळ प्रमुख संगीता चव्हाण, माणगाव प्रमुख अक्षता मोरे, विधी सावंत, आपटे प्रमुख मधुमती नाईक आदींसह संस्थेचे सर्व संचालक, सभासद, खातेदार, हितचिंतक, भागधारक, सर्व शाखांचे, शाखाधिकारी संभासद, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा उत्साहात साजरा करण्यासाठी संस्थेचे माणगाव शाखाधिकारी राकेश पडवळ, मोर्बा संदीप सकपाळ, महाड सुशांत जाधव, सवाद-पोलादपूर इंदिरा हनुमंत लावन, बिरवाडी संगीता श्रीहरी जाधव, उरण राम म्हात्रे, पनवेल येथील ॲड. सविता गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

# अलिबाग-पेण रस्ता खड्ड्यात

**| बांधण | प्रतिनिधी |**

अलिबाग-पेण रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच दयनीय होत चालली आहे. या रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, प्रवासी जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत. विकासाची आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, असा आरोप स्थानिकांसह वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना संबंधित प्रशासनाला याबाबत काहीच देणे-घेणे नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.





अलिबाग-पेण मार्गावरील खड्ड्यांमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. पर्यटनासाठी अलिबागसह अन्य ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांनादेखील या खड्ड्यांतून प्रवास करावा लागत आहे. रुग्णवाहिकेतून रुग्णांची ने-आण करणाऱ्या रुग्णांनादेखील या खड्ड्यांचा त्रास होत आहे. येत्या आठ दिवसांमध्ये गणरायाचे आगमन होणार आहे. या खड्ड्यातून बाप्पाचे स्वागत होणार आहे. त्यामुळे भाविकांसह नागरिकांकडून प्रशासन व सरकारबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# ‘सणासुदीत कायदा, सुव्यवस्थेचे पालन करावे’

**| खांब | प्रतिनिधी |**

आगामी काळात येणाऱ्या सणासुदी प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करीत शांततेचे भंग न होता शांतता प्रस्थापित करीत आपले पारंपरिक सण उत्सव एकत्रितपणे सलोख्याने एकदिलाने साजरे करण्याचे आवाहन रोहा पो. निरिक्षक मारूती पाटील यांनी खारी हनुमान मंदिर सभागृहामध्ये आयोजित शांतता कमिटी सभेप्रसंगी उपस्थितांना केले.



याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक पो.नि.मारुती पाटील, खारी गावचे अध्यक्ष तथा खारगाव ग्राम पंचायतचे विद्यमान सरपंच दत्तात्रेय काळे, उपसरपंच रामदास दळवी, गोपनीय विभागाचे वाय.ए.तडवी, पोलिस कॉन्स्टेबल जी.एम. टेमकर, ज्येष्ठ नागरिक रामचंद्र खिरीट, नथुराम काळे, दिलीप खिरीट, तुकाराम म्हस्के, चंद्रकांत टिकोणे, प्रमोद काळे, महादेव शिर्के, रामचंद्र दळवी, मनोहर शेळके, रोशन शिर्के,निखील टिकोणे, कौशल मुसळे, प्रशांत टिकोणे, मयूर दळवी, प्रणित खरिवले आदींसह खारी ग्रामस्थ मंडळ, तरुण मित्र वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भारतीय सशस्त्र सेना दलामध्ये भरती झालेला फारुक शेख याचे पो.नि.मारुती पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक केशव म्हस्के यांनी केले, तर सरपंच दत्तात्रेय काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मोरेश्वर जाधव यांचे निधन

खांब : रोहा तालुक्यातील मेढा गावचे रहिवासी माजी पोलीस पाटील मोरेश्वर बाळकृष्ण जाधव (अण्णा) यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी दि. १० ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले.



त्यांच्या पश्चात चार मुली आणि तीन मुलगे, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार असून, त्यांचे दशक्रियाविधी मंगळवार, दि.१९ ऑगस्ट रोजी तर अंतिम धार्मिक विधी बारावे गुरुवार, दि.२१ ऑगस्ट रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती निकटवर्तीयांनी दिली.

# विश्वनिकेतनचे ११७ विद्यार्थी परदेशात



**| रसायनी | प्रतिनिधी |**

खालापूर तालुक्यातील कुंभिवली येथील विश्वनिकेतन संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय, हे गेल्या बारा वर्षांपासून भारतातील अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना परदेशातील विविध विद्यापीठांमध्ये ४५- दिवसांसाठी प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत आहे. मागील बारा वर्षांत या उपक्रमाद्वारे भारतातील १५० हून अधिक महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे. सन २०२५ साठी भारतातील १०० हून अधिक महाविद्यालयांतून ३००० विद्यार्थ्यांचे आवेदन प्राप्त झाले होते. ठराविक निकषांनुसार, काटेकोर निवड प्रक्रियेनंतर ११७ विद्यार्थ्यांची या प्रशिक्षणाच्या उपक्रमासाठी निवड करण्यात आली होती. नुकतेच हे विद्यार्थी यशस्वीपणे प्रशिक्षण घेऊन भारतात परतले आहेत.

भारतातील अभियांत्रिकी शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आणि प्रकल्पाधारित शिक्षण (प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग) प्रस्थापित करण्यासाठी विश्वनिकेतन हे ‘सेंटर फॉर टेलि इन्फ्रास्ट्रक्चर ग्लोबल कॅप्सूल’ या जागतिक संस्थेसोबत गेल्या बारा वर्षापासून कार्यरत आहे. निवडलेल्या विद्यार्थ्यांनी डेटा सायन्स, इंडस्ट्री ४., सायबर सुरक्षा, आर्टिफिशल इंटेलिजन्स, नवनिर्मिती व स्टार्टअप विकास अशा अत्याधुनिक जागतिक तंत्रज्ञानांवर आधारित प्रकल्पांवर काम केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रकल्प प्रशिक्षण पूर्णतेचे प्रमाणपत्र संबंधित परदेशी विद्यापीठांकडून प्रदान करण्यात आले.

यावर्षी विद्यार्थ्यांना टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ बर्लिन (जर्मनी), युनिव्हर्सिटी ऑफ नॅशनल अँड वर्ल्ड इकॉनोमी (बल्गेरिया), हेलेनिक अमेरिकन स्कूल (ग्रीस), टेक्निकल युनिव्हर्सिटी ऑफ सोफिया (बल्गेरिया), आणि अविघ्नं युनिव्हर्सिटी (फ्रान्स) या नामांकित विद्यापीठांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. या करारांमुळे भारतीय विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रगत तंत्रज्ञान, संशोधन पद्धती आणि उद्योगातील अद्ययावत घडामोडींचा थेट अनुभव घेण्याची संधी मिळते.

## अशोक ठाकूर यांना देवाज्ञा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

आवरे येथीलआत्माराम ठाकूर मिशन संचलित व जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कुलचे संस्थापक अध्यक्ष अशोक ठाकूर (५७) यांचे १५ ऑगस्ट रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांनी आवरे येथे आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलची स्थापना केली आहे. ते विज्ञान शाखेचे पदवीधर होते. विज्ञान व गणित या विषयावर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले आहेत. अंत्यविधीप्रसंगी प्रकाश पाटील, सुधाकर पाटील, एम.के. म्हात्रे, महेश गावंड तसेच अन्य जणांची आदरांजलीपर भाषणे झाली. त्यांचा दशक्रिया विधी २४ ऑगस्ट रोजी वशेणी खाडी येथे होईल. तर, त्याच दिवशी उत्तर कार्य हे त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती ठाकूर कुटुंबियांनी दिली.

# पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा कार्यक्रम रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सरलादेवी मंगल कार्यालय हॉल माणगाव याठिकाणी राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते तसेच शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या विशेष उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे तालुका पत्रकार संघाने आयोजन केले होते.



या सोहळ्यात रायगड जिल्ह्यातील उरण येथील आगरी समाजातील पहिली विमान पायलट प्राप्ती राज ठाकूर (आकाश गौरव स्त्रीशक्ती पुरस्कार), गेटवे ऑफ इंडियाजवळ गेल्यावर्षी घडलेल्या बोट दुर्घटनेत ३० लोकांचे प्राण वाचविणारे आरीफ आदम बामणे (देवदूत पुरस्कार), क्रिकेट खेळात महाराष्ट्राच्या महिला संघात यष्टीरक्षक व फलंदाजांची भूमिका पार पाडणाऱ्या वैष्णवी पृथ्वीराज माणकर (क्रीडा क्षेत्र पुरस्कार) यांना विशेष पुरस्काराने भरत गोगावले यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास व्यासपीठावर शिवसेनेचे तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र माणकर, राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, उद्योजक विजय मेथा, तरुण मराठी उद्योजक सुभाष दळवी, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, लोणेरेचे उद्योगपती सीताराम उभारे, जुने माणगाव मस्जिद मोहल्ला अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते आदी मान्यवरांसह पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्रीकांत गणगणे (आदर्शवत प्रशासकीय अधिकारी), अपूर्वा जंगम (गुणवंत शिक्षक), ज्योती मेथा (हिरकणी पुरस्कार), डॉ. चंद्रशेखर साकोलीकर (वैद्यकीय सेवा), दिनेश रातवडकर (सामाजिक सेवा), प्राची खेतम (आदर्श महिला सरपंच), इरफान हाजीते (तरुण उद्योजक), अनिल पवार (अध्यात्मिक क्षेत्र), निलेश पवार (आदर्श पत्रकार), सरिता दपके (आदर्श ग्रामसेविका), सुरेखा तांबट (आदर्श गटशिक्षणाधिकारी), राजेश गंडाळे (आदर्श कर्मचारी), मंगेश मेथा (यशस्वी उद्योजक), दिपक शेरकर (कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीस), निशिगंधा भारमल (आदर्श महिला तलाठी), दिनेश गुगळे (सेवाभावी कार्यकर्ता), बाळा मांजरे (समाजरत्न) पुरस्काराने गौरविण्यात आले.



# गिरोबा मंदिरासाठी समीर शेडगेंकडून आर्थिक मदत

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा शहरातील अंधार आळी येथील जागृत देवस्थान गिरोबा मंदिराच्या डागडुजीसाठी रोह्याचे माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांच्या जनार्दन शेडगे मित्र मंडळाकडून एक लाख रुपये मदत देण्यात आली.

समीर शेडगे यांनी श्री गिरोबा मंदिराचे दर्शन घेऊन उपस्थित ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी समीर शेडगे यांच्या कडून मिळालेली मदत अंधार आळी येथील ग्रामस्थांनी मनापासून स्वीकारली व लाख मोलाची मदत करणारे समीर शेडगे यांचा ग्रामस्थांनी शाल, श्रीफळ व गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. यावेळी दत्ता जगताप, राजा शिंदे सूरज राऊत, संजय अवसरे, उदय धनावडे, स्वप्नील धनावडे, स्वप्नील पवार,सचिन कारखानीस, समीर दळवी, तेजस शिर्के, अमेय जाधव, लवकेश सानप, भाऊ धनावडे, जयदेश अवसरे, रोहित शिंदे, प्रतीक काजारे, मानस भगत, अक्षय मोंडे, अंकित मोहिते, संकेत अवसरे आदी जण उपस्थित होते.

## २० कोटींची सुवर्णकहाणीमुळे अर्थक्रांती | अनारीकरांमुळे गावाचा सर्वांगीण विकास

# फुलांच्या सुवासात फुलले ‘अनारी’

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील डोंगरांच्या कुशीत वसलेले, केवळ दीड हजार लोकसंख्या असलेले अनारी हे छोटेसे गाव. आज संपूर्ण महाराष्ट्रात ‘फुलवाल्यांचे गाव’ म्हणून ओळखले जाते. मुंबई-ठाण्यासारख्या महानगरांत फुलांच्या व्यवसायात भक्कम पाय रोवून बसलेल्या अनारीकरांमुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला मोठा आर्थिक हातभार लागतो आहे. या अर्थक्रांतीमुळे गावाला उभारी मिळाली आहे.

गावाचा पारंपरिक व्यवसाय भातशेती असला, तरी गेल्या अडीचशे वर्षांपासून अनारीकरांचे उपजीविकेचे खरे साधन म्हणजे फुलांचा व्यवसाय. या व्यवसायाची सुरुवात ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे गावातील एका ग्रामस्थाने केली होती. ज्यातून फुले मुंबई बाजारात पोहोचू लागली आणि अनारीकरांच्या मेहनतीने ही उद्योगसाखळी वाढत गेली. आजच्या घडीला मुंबईतील ताडदेव, धोबी तलाव,



कुलाबा, दादर, ग्रँट रोड, नाना चौक, माहीम, माटुंग, बोरीवली ते नालासोपारा, वसई-विरार, ठाणे, बदलापूर, अंबरनाथ, भाईंदर अशा बऱ्याच भागांत अनारीचे सुमारे ३०० हून अधिक नागरिक फुलांच्या व्यवसायात कार्यरत आहेत. गावातील जवळपास प्रत्येक कुटुंबाचा फुल उद्योगाशी थेट संबंध असून, ७० टक्क्यांहून अधिक मुंबईतील अनारीकर हे या व्यवसायाशी निगडित आहेत.

गुलाब, गुलछडी, कागडा, नेव्हाळी, जुई, मोगरा, अष्टर, गोंडा, सायली, कन्हेर, तगर, शेवंती, लिली, ऑर्चीट, अंक्युरीयन, जरबेरा अशा विविध प्रकारच्या फुलांची खरेदी मुंबईतील भुलेश्वर, दादर, एल्फिन्स्टन मार्केटमधून होते. लग्नसमारंभ, धार्मिक उत्सव, राजकीय कार्यक्रम, मंदिर सजावट ते घरगुती डेकोरेशनपर्यंत सर्वच ठिकाणी अनारीकरांची सजावट कौशल्य गाजते.

एक दुकान मालकाव्यतिरिक्त किमान ४ गावकऱ्यांना रोजगार देते, अशी या व्यवसायाची ताकद आहे. अंदाजे ८ लाख रुपये वार्षिक उलाढाल एका दुकानाची असून, एकूण गावाची उलाढाल १५ ते २० कोटी रुपयांपर्यंत पोहोचते. हा महसूल केवळ मुंबईतच नव्हे, तर चिपळूण, पिंपळी, शिरगाव, अलोरे, खेर्डी, सावर्डे परिसरात सुरू झालेल्या नव्या दुकानांमुळे आणखी वाढत आहे. सध्या या नव्या उपक्रमातून अनारी गावातील स्थानिक ५० तरुणांना रोजगार मिळाला असून, खेड, गुहागर, संगमेश्वर, रत्नागिरी येथेही विस्ताराचे नियोजन आहे.

या उद्योगात दिवसाची सुरुवात पहाटे ३ वाजता होते आणि काम रात्री उशिरापर्यंत सुरू राहते. यातून समाधान, सन्मान आणि स्थैर्य या गावातील व्यवसाय करणाऱ्यांना मिळते. भविष्यात महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये व्यवसाय विस्तारासोबतच गावातच फुलशेती सुरू करण्याचा विचारही सुरू आहे, ज्यामुळे कच्च्या मालासाठी बाहेरील बाजारांवरील अवलंबित्व कमी होईल. अनारीकरांची म्हण आहे- ‘‘उधार-पाधार, फुल व्यवसायाचा आधार’’ आणि या बळावरच आज अनारी गावाचे नाव महाराष्ट्रातून जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचत आहे.

# एम्समार्फत ४७ गावांची तपासणी

## दिल्लीतील केंद्रीय समितीकडून पाहणी; स्वच्छता सर्वेक्षण उपक्रमाची तयारी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत स्वच्छता सर्वेक्षण या उपक्रमाची तयारी जिल्ह्यात गेल्या महिन्याभरापासून सुरु होती. रायगड जिल्हयातील १२ तालुक्यातील ४७ गावांची पहाणी दिल्लीतील केंद्रीय समितीकडून करण्यात आली. केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने मान्यता दिलेल्या दिल्ली येथील अँकेडमी फॉर मॅनेजमेंट स्टडी या संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली.**



रायगड जिल्हयातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार इतकी आहे. जिल्ह्यात ८०९ ग्रामपंचायती असून एक हजार ८३० गावांचा समावेश या ग्रामपंचायतीमध्ये आहे. वाड्यांदेखील जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहेत. गावे, वाड्यांमधील स्वच्छतेवर जिल्हा परिषदेमार्फत कायमच भर दिला जात आहे. घंटागाडीपासून कंपोस्ट पीठ सारखे उपक्रम राबवून गावांमध्ये स्वच्छता ठेवण्याचे आवाहन कायमच केले जात आहे. मात्र, जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतीच्या प्रवेशद्वारा समोरच कचरा पडलेला असतो. काही ठिकाणी रस्त्याच्या दुर्तफा कचरा असल्याने येणाऱ्या जाणाऱ्यांना त्याचा प्रचंड त्रास होतो. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत स्वच्छता सर्वेक्षण ग्रामीण २०२५ हा उपक्रम रायगड जिल्ह्यात सुरु करण्यात आला.

केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने मान्यता दिलेल्या दिल्ली येथील अँकेडमी फॉर मॅनेजमेंट स्टडी या संस्थेमार्फत तपासणी करण्यात आली. अलिबाग तालुक्यातील आंबेपूर, कुर्डुस, चौल, सुडकोली, नवखार तर्फ उमटे, धोकवडे, बोरघर. रोहा तालुक्यातील भिसे, धाटाव, नागोठणे, वणी. कर्जतमधील सालपे, वारे, बारडी, आर्डे. श्रीवर्धनमधील भोस्ते-भट्टीचा माळ. पेणमधील बोझें, खारपाले, जिते, रावे, वरेडी, पाटणोली. पनवेलमधील वहाळ, ओवळे, वावेघर, आपटा, चिपळे, नेरे, दुंदरे. माणगावमधील दाखणे, लोणशी, शिरवलीमधील सांगी. सुधागडमधील चिकलगाव, उन्हेरे बुद्रुक, महागाव, पेडली. उरणमधील नवीन शेवा, सारडे. महाडमधील चिभावे मोहल्ला, दाभोळ, मोहोत, पारमाची, राजेवाडी. म्हसळामधील खरसई बनोटी. खालापूरमधील वडगाव, चौकमधील नानिवली येथील गावांना भेटी देण्यात आल्या.

सर्वेक्षणामध्ये गाव पातळीवरील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर, दृश्यमान स्वच्छता, ओला व सुका कचरा वेगळीकरण, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गाव खड्डे, प्लास्टिक संकलन व व्यवस्थापन, घरोघरी भेटी, शौचालयाचा नियमित वापर, कचरा व्यवस्थापनाच्या सवयींचा आढावा घेण्यात आला. शाळा, अंगणवाड्या, बाजारपेठा, धार्मिक स्थळे व सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता देखील तपासण्यात आली, असल्याची माहिती जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता मिशन विभागाकडून देण्यात आली.

### विविध निकषांवर मूल्यमापन होणार

**सर्वेक्षणात गावांचे मूल्यांकन एकूण एक हजार गुणांच्या आधारे केले जाणार आहे. यामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन १२० गुण, ग्रामस्थांचा प्रतिसाद व मानसिकतेत झालेला बदल १०० गुण, स्वच्छता सुविधांचा वापर २४० गुण, गावांची प्रत्यक्ष पाहणी व प्रश्नावली ५४० गुण, मोबाईल ॲप व घरगुती सर्वेक्षणवर आधारित नागरिक अभिप्राय प्रत्येकी ५० गुण, अशा विविध निकषांवर मूल्यमापन होणार आहे.**

# निवडक

## नर्सिंग होमकडून गोविंदांवर उपचार



**रोहा :** रोहे शहर व ग्रामीण भागात सालाबाद प्रमाणे यंदाही गोकुळाष्टमी सण उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या उत्सवाच्यानिमित्त सराव करताना किंवा गोकुळाष्टमी साजरी करताना गोविंदा जखमी झाल्यास त्याच्यावर डॉ. अपूर्व भट यांच्या भट नर्सिंग होममध्ये मोफत उपचार करण्यात येईल असे आवाहन करण्यात आले होते. शनिवारी गोकुळाष्टमी उत्सव साजरा करीत असताना ८० गोविंदा जखमी झाले. या जखमी गोविंदांवर डॉ. अपूर्व भट व त्यांच्या टीमकडून मोफत उपचार करण्यात आले.

## श्री संत शिरोमणी पुण्यतिथीचे आयोजन

**नागोठणे :** नाभिक समाजाचे थोर संत श्री संत शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथीचे आयोजन बुधवार (दि. २०) ऑगस्ट रोजी नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिर प्रांगणातील श्री संत ज्ञानेश्वर मंदिरात करण्यात आले आहे. समाजाचे आधारस्तंभ भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे विभाग नाभिक संघ, महिला आघाडी व संत सेवा मंडळ नागोठणे यांच्या वतीने साजरी करण्यात येणाऱ्या या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला सर्व नाभिक बंधू आणि भगिनींनी आपल्या कुटुंबासह उपस्थित राहावे असे आवाहन नाभिक संघ नागोठणे विभाग अध्यक्ष बाळासाहेब टके यांनी केले आहे.



## किराणा मालाचे वाटप

**पाली :** गोपाळकाल्यानिमित्त श्रीकृष्णाने गोपिकांनी उंच सुरक्षित ठेवलेले मडक्यातील लोणी व दही थर लावून काढले व गरीब सवंगड्यांना खायला दिले. भगवान श्री कृष्णाचा आदर्श ठेऊन सुधागड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तसेच रॉबिनहूड आर्मी संस्थेच्या वतीने १५० गरीबांच्या घरात दही, नाही पण किराणा सामान पोहचवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील केले गेले. यावेळी तुकाराम ठोंबरे, भगवान दळवी महाराज, दीपक कदम, कृष्णा वाघमारे, अशोका पवार, रॉबिनहूड आर्मी संस्था, ठाणे पदाधिकारी व सदस्य, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**श्रीवर्धन :** बोर्ली पंचतन येथील सम्मित्र सेवा संस्थेच्या वतीने अ. स. ई. अंतुले माध्यमिक शाळा दिघी येथील आदिवासी आणि गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. उपक्रमासाठी हर्षद जैन, किरीट संघवी, क्षितिज संघवी, सूर्यकांत चव्हाण, अभिषेक यादव, सुजित खनलोसकर, वसीम फकजी, विराज तोडणकर, अंकुर माने आदी मान्यवरांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुंडे यांनी केले. सदर कार्यक्रमास अनंत मेंदाडकर, नितीन सुर्वे, समीर दिवेकर, गणेश वेळासकर, ॲड. शैलेश चांदोरकर, मनीष अमृसकर उपस्थित होते.



## शिष्यवृत्ती परीक्षेत दक्ष नाईक ओबीसी गटातून जिल्ह्यात पहिला

**खरोशी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत दक्ष रमेश नाईक हा शाळा आमटेम या पेण या प्रशालेतील विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून ग्रामीण भागात ओबीसी गटात जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. त्याला २४४ गुण मिळाले. जिल्ह्यात प्रथम आल्याबद्दल त्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. पेण पंचायत समितीकडून वरिष्ठ विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे, विजय पाटील, लक्ष्मण तांबोळी, जनार्दन तांबोळी व सर्व सदस्य तसेच मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. त्याला मार्गदर्शन करणारे महेंद्र पाटील यांचेही कौतुक करण्यात आले.

क्लासिफाईड्स
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८

● अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



पनवेल बाजारपेठेत मुर्तिकारांच्या कलाकारीतून गौराई सजल्या आहेत. (छायाचित्रः राजेश डांगळे)

## कौशल्ये मनात रूजवा- सुनील गवळी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

एम्पॉवर इंडिया अंतर्गत सेतू कार्यक्रम सर्व किशोरवयीन मुला-मुलींपर्यंत तसेच त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचला पाहिजे. जेणेकरून सर्व मुले ही जीवनकौशल्य शिकून सक्षम बनतील. त्यांच्या सामाजिक परिस्थितीला सामोरे जाऊन एक सुजाण नागरिक घडले पाहिजे. या संस्कारक्षम वयात ही कौशल्ये मनात कायमस्वरूपी रुजली पाहिजेत, असे आवाहन गट शिक्षण अधिकारी सुनील गवळी यांनी केले.



एम्पॉवर इंडिया, जिल्हा परिषद रायगड व पंचायत समिती, अलिबाग तसेच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने पी. एन. पी. कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ट महाविद्यालय येथे बुधवारी (दि.१३) तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेमध्ये किशोरवयीन मुला-मुलींकरीता एम्पॉवर इंडिया संस्थेच्या वतीने सेतू कार्यक्रमाची अंमलबजावणी, रूपरेषा व उद्देश समजून घेणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतु होता. या कार्यशाळेत अलिबाग तालुक्यातील नऊ शाळांमध्ये हा कार्यक्रम सुरू झाला आहे. सेतू कार्यक्रमांतर्गत जीवनकौशल्य, आरोग्य-पोषण, लिंगभाव समता आणि सुरक्षा तसेच आर्थिक साक्षरता या विषयांवर किशोरवयीन मुलांसोबत वर्षभर संवाद तसेच त्यांना ज्ञान देण्यात येणार आहे. या कार्यशाळेत मागील वर्षी ज्या शाळांमध्ये संस्थेने काम केले होते. त्यातील उत्कृष्ट शाळा, उत्कृष्ट मुख्याध्यापक व उत्कृष्ट शिक्षक असे पारितोषिक वितरण सुद्धा करण्यात आले. कार्यशाळा पी. एन. पी. कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडली.

## कर्जत नगरपरिषदेच्या भौगोलिक सीमा प्रसिद्ध

। कर्जत । वार्ताहर ।

कर्जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धी जाहीर सूचना सोमवार (दि.१८) ऑगस्ट रोजी करण्यात आली. तसेच प्रभागाच्या भौगोलिक यादी नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

कर्जत नगरपरिषद, जि. रायगडच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्ध करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना सोमवार (दि.१८) ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी हरकती व सूचना मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद यांच्याकडे सादर करावयात. सोमवार (दि.१८) ऑगस्ट ते रविवार (दि. ३१) ऑगस्ट २०२५ दुपारी ३.०० वा. पर्यंत हरकती व सुचना दाखल करण्यात याव्यात, नागरिकांना सुनावणी करिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल असे नगरपरिषद प्रशासनाने सांगितले आहे.



## होमगार्ड प्रशिक्षण शिबिराची सांगता

। वेणगाव । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा जिल्हा प्रशिक्षण केंद्र होमगार्ड रायगड येथे घेण्यात आलेले आठ दिवसाचे होमगार्ड उजळणी प्रशिक्षण शिबीर सोमवार (दि. १८) ऑगस्ट रोजी उत्साहात संपन्न झाले.

जिल्हा समादेशक अभिजित शिवथरे, अपर पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली ११ ऑगस्टपासून सुरुवात झालेल्या शिबिरात, रायगड जिल्ह्यातील कर्जत, नेरळ, चौक, पेण, पनवेल, महाड, पोलादपूर, अलिबाग, उरण, रोहा, पाली, मुरुड, आदी पथकातील एकूण ५८ होमगार्ड प्रशिक्षणार्थी जवानांनी सहभाग घेतला होता.

सदर शिबिरामध्ये कवायतीचे प्रकार, लाठी कवायत, प्रथमोपचार, विवचन, अग्निशमन, शस्त्र प्रशिक्षण तसेच उत्सव, सणामध्ये आपली जबाबदारी कशा प्रकारे पार पाडायची इत्यादीची माहिती अधिकाऱ्यांमार्फत प्रशिक्षण देण्यात आली.

सदर शिबिरामध्ये होमगार्ड केंद्र नायक जनार्दन पवार यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षक मनाली पाटील, वरिष्ठ पलटण नायक, रमेश तरे, पलटण नायक, संग्राम पाटील, अविनाश मिसाळ, या अधिकाऱ्यांनी उपस्थित होमगार्ड जवानांना उत्तम प्रशिक्षण देण्यात आले. दरम्यान, हे प्रशिक्षण यशस्वी झाल्याचे प्रशिक्षणार्थी सांगत आहेत.

## डिफेन्स अकॅडमीतर्फे स्वच्छता मोहीम

। अलिबाग । प्रतिनिधी ।

स्वच्छतेचे धडे देणाऱ्या अलिबागमधील डिफेन्स ॲकेडमीतर्फे स्वच्छतेचा संदेश पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत अलिबाग समुद्रकिनारी या ॲकेडमीतर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत ॲकेडमीमधील पाच वर्षापासून ४० वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेऊन किनाऱ्याची स्वच्छता राखली.

### अलिबाग समुद्रकिनारा केला स्वच्छ

मोहिमेत ॲकेडमीचे संस्थापक समरेश शेळके, चीफ इन्स्ट्रक्टर अक्षय पाटील, अमिषा भगत, सागर हिसाळके, ट्रेनर हर्षल अहिरे, मानसी खातू, सागर मार्गी, आणि विद्यार्थी रुही ठाकूर, परिणीता शर्मा, सुभाष शर्मा, शर्लिन वार्डे, दुर्वा शेळके, संघर्ष मार्गी, आदित्य गव्हाणे, श्रेयस गावंड, साई राऊळ, मंथन पटेल यांनी सहभाग घेतला. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी खुप पाऊस असतानादेखील डिफेन्स अकॅडमीने अलिबाग समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. मोहिमेत ज्या लहान मुलांनी श्रमदान केले. ते देशाच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेले मोलाचे योगदान आहे. देशाच्या उज्वल भविष्याची नांदी आहे.

गेल्या अनेक वर्षापासून डिफेन्स ॲकेडमीतर्फे सुरक्षेचे धडे दिले जात आहे. स्वरक्षणाचे धडे देत असताना, विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी, श्रमदानाचे महत्व देखील वेगवेगळ्या उपक्रमांतून पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनाच्यानिमित्त दरवर्षी ॲकेडमीमार्फत स्वच्छता मोहिम राबविली जाते. यावर्षीदेखील त्यांनी हा स्तुत्य उपक्रम हाती घेऊन यशस्वी केला.

## शांततेचे आवाहन

**म्हसळा :** म्हसळा तहसील कार्यालयात तहसीलदार सचिन खाडे यांच्या अध्यक्षतेत शांतता समिती सभा घेण्यात आली. सभेला परशुराम मांदाडकर, सलीम उकये, सुनिल उमरोटकर, योगेश करडे, सुरेश कुडेकर, अनिल बसवत, सोहेब हलदे, मोरेश्वर पाटील, कौस्तुभ करडे, राजेंद्र बोरकर, निलेश करडे, स्वनिल चांदोरकर, वैभव कळस, निलेश लटके, व्हि. पी. दांडेकर, नांदगावकर, जि.प आरोग्य, बांधकाम, पंचायत समिती, नगरपंचायत आदी खात्याचे अधिकारी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक संदीप कहाले यांनी आगामी उत्सवात नागरिकांनी सहकार्य करण्याची आवाहन केले.

**प्रवासी वर्गासाठी ठरणार मदतगार | गर्दीतून जाण्याचे संकट होणार दूर**

## स्कायवॉक प्रवाशांसाठी खुला

। नेरळ । प्रतिनिधी ।

**मध्य रेल्वेवरील मेन लाईनवर असलेल्या नेरळ जंक्शन स्थानकात मुंबई रेल्वे महामंडळाकडून उभारण्यात आलेला स्काय वॉक प्रवासी वर्गासाठी खुला करण्यात आला आहे. नेरळ स्थानकातील हा स्कायवॉक एकाच वेळी तीन पादचारी पूलांना जोडणारा असून एकाचवेळी दोन पादचारी पूल आणि स्कायवॉक प्रवासी वर्गासाठी खुले करण्यात आले आहेत.**



मध्य रेल्वेवरील कर्जत मार्गावर नेरळ जंक्शन स्थानक असून या स्थानकातून माथेरान या पर्यटन स्थळी जाणारी मिनी ट्रेन चालवली जाते. त्यामुळे या स्थानकाचे असलेले महत्व लक्षात घेऊन नेरळ स्थानकात अनेक विकासाची कामे सुरू आहेत. स्कायवॉक फलाट एकवरून मिनी ट्रेनचे मार्गावरून थेट रेल्वे पार्किंगमध्ये उतरला आहे. स्कायवॉकमुळे फलाट एक किंवा दोन वर उतरणारा प्रवासी थेट बाजारपेठेत जाऊ शकणार आहे. त्यामुळे प्रवाशांना नेरळ स्थानकाच्या बाहेर गर्दीमधून जाण्याचे संकट दूर झाले आहे. स्कायवॉक साधारण एक किलोमीटर लांबीचा असून हा स्काय वॉक सुरू झाल्याने माथेरान येथून येणारे पर्यटक आता थेट नेरळ स्थानकात पोहचू लागले आहेत.

स्कायवॉक नेरळ स्थानकातील फलाट एक वरील तब्बल तीन पादचारी पुलांना जोडत आहे. स्कायवॉकमुळे कायालापाट होणार आहे. दुसरीकडे फलाट एक वर दोन ठिकाणी सरकते जिने बनविले जात असून या माध्यमातून स्थानकाच्या बाहेर पडणारे प्रवासी देखील स्कायवॉकच्या माध्यमातून स्थानकाच्या बाहेर पडू शकणार आहेत. स्कायवॉक सुरू झाल्याने रेल्वे पार्किंगमधील वाहनांची गर्दी वाढणार आहे. स्कायवॉक अनेक बाबतीत प्रवासी वर्गासाठी मदतगार ठरणार आहे, तसेच अनेक दृष्टीने त्रासदायक देखील ठरू शकणार आहे.

### तिकीट व्यवस्था

**नेरळ गावातून उपनगरीय लोकलसाठी बाहेर पडलेले प्रवासी हे नेरळ स्थानकात पोहचणार आहेत. त्यामुळे स्कायवॉक वर प्रवासी वर्गासाठी उपनगरीय गाड्यांचे तिकीट काढण्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. तशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटना यांच्याकडून मध्य रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे केली आहे.**

### रात्रीच्या वेळी धोकादायक

**स्कायवॉक रात्रीच्या वेळी गर्दूळे आणि चोरी करण्याचे उद्देशाने येणाऱ्या लोकांसाठी फायदेशीर ठरणार आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने तत्काळ स्कायवॉकवर काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत अशी मागणी प्रवासी करीत आहेत. त्याचवेळी रात्रीच्या वेळी होमगार्ड यांची फेरी आणि एक दोन होमगार्ड सतत बसलेले असले पाहिजेत अन्यथा एकट्या प्रवासासाठी हा स्कायवॉक रात्रीच्यावेळी धोकादायक ठरू शकतो. त्याचवेळी प्रेमी युगल यांना आवरण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा यंत्रणेवर असणार आहे.**

# प्रशांत यादवांचा आज भाजपमध्ये प्रवेश



**चिपळूण :** वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन, सहकारातून हजारो कुटुंबांना रोजगार देणारे आणि चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघातून अल्पशा मतांनी पराभूत झालेले लोकप्रिय तरुण नेते प्रशांत बबन यादव आज मंगळवारी (दि.१९) आपल्या हजारो समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत. मुंबईतील नरिमन पॉईंट येथील भाजप प्रदेश कार्यालयात हा भव्य पक्ष प्रवेश सोहळा पार पडणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार नारायण राणे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री ना. नितेश राणे आदी नेत्यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.अरुमुगम के व सौ.रूपा मदेश दोघेही रा.घर क्र.१०२. ए विंग, लक्ष्मी ऑर्चिड, धामोते, नेरळ, ता.कर्जत यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेणेसाठी आमचे अशिलांनी एकुण ठरलेल्या २१,००,०००/- (अक्षरी रक्कम रू.एकविस लाख मात्र ) किंमतीपैकी रक्कम रूपये ८,६८,६००/- (अक्षरी रक्कम रू.आठ लाख अडुसष्ट हजार सहाशे मात्र) श्री. अरुमुगम के व सौ. रूपा मदेश यांना दिलेले आहेत. परंतू सदर श्री.अरुमुगम के व सौ.रूपा मदेश हे दोघेही आमचे अशिलांस खरेदीखत करून देण्यास टाळाटाळ करीत आहेत. म्हणून आमचे अशिलांनी पनवेल येथील पाचवे दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पे.मु.२५७/२०२५ हा दावा दाखल केलेला आहे. त्याचे काम प्रलंबित आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन**

सदनिका क्र.१०२. पहिला मजला, ए विंग, लक्ष्मी ऑर्चिड, पेशवाई रोड, साई मंदिर, मौजे धामोते, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड

सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार संबंधित लोकांशी करू नये अन्यथा सदर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कळावे.

तारीख - १९-०८-२०२५

श्री.मारूती रावसाहेब गायकवाड
मो. ९३७३०७२६८८

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी.एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं- ९५६१७१ ९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या भातशेती मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) टेकाळी, ता. अलिबाग | २१५ | ० -४५-८० पैकी क्षेत्र ०-१८-२३ | ८.४३ | गणेश एकनाथ मढवी रा. मु.पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड |
| २) टेकाळी, ता. अलिबाग | २३१/४ | ०-१५-८० | १.७० | प्रकाश मोरेश्वर कवळे रा. मु.पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड |

सदरहू भातशेती मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १८/०८/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग
जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७३/६ | एकूण क्षेत्र ०-७६-०० हे.आर. | ०.६० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ (तीन) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-१९/०८/२०२५ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
ठिकाण :- पनवेल पत्ता:- शॉप नं.२३, प्लॉट नं.५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे किकवी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७९/५/ब/२ | एकूण क्षेत्र १-१२-०० हे.आर. | ०.६९ |

**मौजे चई, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १५/४/ब/१ | एकूण क्षेत्र १-५८-०० हे.आर. | १.२२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १९/०८/२०२५ **ॲड. रोहित रो.मानकवळे**
ठिकाण :- पनवेल पत्ता:- शॉप नं.२३, प्लॉट नं. ५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक अर्चना राजीव कुलकर्णी व राजीव भीमसेन कुलकर्णी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०/७ | ४-१८-०६ | ४२-०० |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९/०८/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल ४१०२०६
दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
ई-मेल : Panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र.- पमपा/मातंवि/२१२५/प्र.क्र.०५/२०२५

अंदाजपत्रक बनविणेकामी

| अनु.क्र. | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | पमपा/मातंवि/२१२५ /प्र.क्र.०५/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भूखंडचे सर्वेक्षण करणेकामी DGPS (DIFFERENTIAl GLOBAL POSITIONING SYSTEM) उपकरण व उपकरणीय प्रणाली खरेदी करणेबाबत. |

या बाजारभावाबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. १९/०८/२०२५ ते दि. २५/०८/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उप आयुक्त (मातंवि)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक समीर अनिल नेरुरकर यांचेकडून खरेदी घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. वर नमूद व्यक्तींनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १५/३ | ००-३०-१० पैकी ००-१३-९५ पोटखराबा ००-०१-१० एकूण ००-१५-०५ | ६.४३ पैकी ३.०९ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १८/०८/२०२५ **ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

दिनांक : १८/०८/२०२५

## जाहीर हरकत नोटीस

सर्व लोकांस या नोटीशीने कळविण्यात येतें की, आम्ही खालील सह्या करणार रमण सिताराम तांबे व रोहित विजय तांबे दोघेही रा. मु. पेढांबे, पो. नारंगी, ता. अलिबाग जि. रायगड यांनी मौजे पेढांबे, ता. अलिबाग भुमापन क्रमांक जुना ३६ व नवीन ३४, क्षेत्र ०-८५-०० हे.आर., पो. ख. ०-०२-०० हे. आर. एकुण क्षेत्र ०-८७-०० हे. आर., आकार ७.१३ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१६-०० हे. आर., आकार २.०० रू.पै. खाते क्रमांक १२२ व १८० अंतर्गत येणारे एकुण क्षेत्र ४८ गुंठे पैकी १६ गूंठे असणारे क्षेत्र ही मिळकत कुमुदिनी कृष्णा वर्तक यांनी विकण्यास काढलेली आहे. असे दिनांक १३/०८/२०२५ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये त्याबाबतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेली आहे. सदर नोटीशीस हरकत लेखी स्वरूपात घेतलेली आहे. सदर मिळकतीमध्ये आकारफोड झालेली नाही तसेच सदर मिळकतीमध्ये सुमारे १४ ते १५ गुंठ्यामध्ये अतिक्रमण असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. या सर्व प्रकाराबाबत निर्माण झालेला तिढा प्रथम सुटणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत सदर मिळकतीची सदर १६ गूंठे क्षेत्राची विक्री झाल्यास त्याबाबत निर्माण झालेला तिढा अजूनच वाढेल.

तरी या नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे पेढांबे, ता. अलिबाग भुमापन क्रमांक जुना ३६ व नवीन ३४, क्षेत्र ०-८५-०० हे. आर., पो. ख. ०-०२-०० हे. आर., एकुण क्षेत्र ०-८७-०० हे. आर., आकार ७.१३ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१६-०० हे. आर., आकार २.०० रू. पै. सदरची मिळकत कोणीही विकत घेवू नये व तसा सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करू नये. याऊपर तसा व्यवहार केल्यास तो आमच्यावर बंधनकारक राहणार नाही व त्यावेळी होणाऱ्या सर्व परिणामांस सर्वस्वी व्यवहार करणारी व्यक्तीच जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : १८/०८/२०२५ **(श्री. सचिन दि. पाटील)**
ॲडव्होकेट
२१, पारिजात सोसायटी
चेंढरे, अलिबाग
जि. रायगड
मो.नं. ९४२३३७५०६९

## जाहीर नोटीस

या नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत जमीन मालक १) श्री. राजू बाळाराम गजने, २) सौ.रेखा सुरेश अष्टावकर यांनी आमचे अशिल मे.एस. जी.रियल्टी, कामोठे यांना विकसना करीता देण्याचे ठरविले आहे.

| भूमापन नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|
| १२१/४/५/१७ | २.६८.०० | २६.८० |

तरी सदर जमिनी बाबत कोणाचेही, कसलेही हक्क, हितसंबध, गहाण, दान, बक्षीस, तारण, पोटगी, क्लेम, फरोक्त, एम.ओयु. साठेकरार, अथवा इतर कसलेही क्लेम असल्यास सदरचे क्लेम व हरकती ह्या हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्या आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. व आमचे अशिल सदर मिळकती बाबत खरेदीखत नोंदवून घेतील याची नोंद घ्यावी.

ता. १९/०८/२०२५ **संतोष जे.म्हात्रे**
ॲडव्होकेट
ऑफीस ०१, रतन व्हिला, परदेशी आळी,
पनवेल, जिल्हा रायगड. ४१०२०६

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री.राकेश (रिकी) लांबा यांचे सोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | खाते क्रमांक | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| टेंभोर्डे, ता.मुरूड | २७ | ५५ | एकुण १-०१-०० | ०.७५ |
| टेंभोर्डे, ता.मुरूड | २७ | ५६ | ०-९२-०० पो.ख ०-२२-०० एकुण १-१४-०० | ०.७५ |

**वर नमुद केलेल्या दोन्ही मिळकतीच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या बाबतीत सदरच्या जाहिर नोटशीचा विषय आहे.**

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीची विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग. सही /-
दिनांक :- १८/०८/२०२५ **ॲड. राकेश नारायण पाटील**
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९२७२६२०००५/८४३२६२०००५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री.जोहर अहमद मोहिद्दीन अहमद व इतर २ यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे मालक सिल्वर लिफ होम मेकर्स भागीदारी तर्फे भागीदार १) श्री. कल्पेश जिवराज चौधरी, २) श्री. जेठालाल करमशी चौधरी, ३) श्री.लाधा बच्चू वाविया, ४) श्री.नरेंद्र महादेव पटेल यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे-ममदापुर, ता. कर्जत, जि. रायगड.**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मौजे-ममदापुर | २१ | ० | ०-३२-४० पो.ख. ०-०८-६० एकुण ०-४१-०० | २ | १२ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०८/२०२५
पत्ता: ब्लॉक नं. १०१, १०२, १०३,
बुरहान प्लाझा, दिलकप कॉलेज रोड.
ममदापुर, नेरळ, ता.कर्जत,
जि.रायगड. ४१०१०१
मो.९०११५५५८०१

सही /-
**ॲड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक सौ. वनिता पंढरीनाथ भोईर, रा.मौजे वदप, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मौजे कुशिवली, ता.कर्जत, जि.रायगड | २१/१/ई | ०-२५-०० | १.८१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १९-०८-२०२५ **ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा.शॉप नं.२ पाल टॉवर भिसेगाव ता. कर्जत
जि. रायगड, मो. ९३०७८८५७११

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांचे खुद्द मालकीच्या खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहीत असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड | २/ब | ३-४०-०० | ३४.०० |
| | ९६/क | १-९९-०० | १९.९० |

अलिबाग सही/-
दि. १८/०८/२०२५ **ॲड.महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एल.एल.बी.
ऑफिस- ऋतुराज प्लाझा, शिवाजी चौकाजवळ
फ्लॅट नं. १, मो. ०९८५००४२२३४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-निगडोली, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| रमेश सिताराम मालकर रामचंद्र सिताराम मालकर अस्मिता अशोक मालकर | ६४ | २/ब | एकूण क्षेत्र ०-६७-०० त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-२७-०० | ३-२० |
| रमेश सिताराम मालकर रामचंद्र सिताराम मालकर अस्मिता अशोक मालकर | ६४ | २/ब | एकूण क्षेत्र ०-६७-०० त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-२०-०० | २-३५ |
| रमेश सिताराम मालकर रामचंद्र सिताराम मालकर अस्मिता अशोक मालकर | ६४ | २/ब | एकूण क्षेत्र ०-६७-०० त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-२०-०० | २-३५ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत खरेदीदारातर्फे वकील
दि. १९/०८/२०२५ **ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रुक, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक प्रथमेश परशुराम बाजी व समिधा सुबोध भोसले यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे तपशिलवर वर्णन पुढीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं./भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| रेवदंडा, ता.अलिबाग | १४२/२/ब | बागायत ०-३२-८० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-३४-३० | १७.८७ |

सदर मिळकतीपैकी प्रथमेश परशुराम बाजी वगैरे १ यांच्या हिश्श्याची ०-१४-१५ पैकी ०-०६-०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र ही बागायत मिळकत या साठेकराराचा विषय आहे.

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहार पुर्ण करतील. मागाहून आलेली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

अलिबाग
दिनांक : १९/०८/२०२५ सही/-
**ॲड.राकेश अ.पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे किहिम ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. सचिन बाळासाहेब चांदोले २) परिमल कृष्णदास रेंगे ३) चंद्रशेखर मंजुनाथ करमरकर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | किहिम, ता.अलिबाग जि.रायगड | २०/२३/५ | एकूण ०.०२.७८ | ०.०० |

हि मिळकत व त्या मिळकती मधील ग्रामपंचायत किहिम घर नं.२०४५ यासहः

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करारमदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १८/०८/२०२५ **ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं.९८२२१८६७४०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जावक क्र. ४३२ दिनांक : १८/०८/२०२५

## ग्रामपंचायत नवेदर नवगाव
### जाहीर प्रगटन
### महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०

ग्रामपंचायत नवेदर नवगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, ग्रा.पं. कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्ज, मृत्युपत्र, अलिबाग येथील मा. सह दुय्यम निबंधक अलिबाग वर्ग-२ दि. १६/०१/२०२४ मृत्यूपत्र अलज/२५/२५ दस्त क्रमांक : २४८/२०२४ मृत्यूपत्रानुसार खालील रकान्यातील असेसमेंट रजिस्टरवरील मालमत्ता फेरफार करण्याचे ठरले आहे.

| अ. क्र. | गाव | घर क्र. | लांबीXरूंदी | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थितीत असेसमेंटवरील नाव | फेरफार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवेदर नवगाव | १२७ | ३१X२६ गावठाण जमीन ३१X२६ | पक्के सिमेंटपत्रे लोडबेअरींग एकमजली | कै. अनंत दत्तात्रेय थळकर | श्री. श्रीरंग अनंत थळकर |
| १ | नवेदर नवगाव | ८४३ | ३०X२७ गावठाण जमीन ५०X३३ | पक्के सिमेंटपत्रे घर | कै. अनंत दत्तात्रेय थळकर | श्री. दामाजी अनंत थळकर |

वरील सर्व असेसमेंट फेरफार नोंदीबाबत कोणाला आक्षेप/तक्रार असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (१४) दिवसांच्या आत ग्रा.पं. कार्यालयात आपल्या मालकी पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**समिक्षा विनोद कवळे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगाव**

**सही/-**
**सौ. प्रियांती आ. घातकी (सरपंच)**
**ग्रामपंचायत नवेदर नवगाव**
**ता. अलिबाग, जि. रायगड**

# निवडक

## सूर्यकुमार फिटनेस टेस्टमध्ये पास

**नवी दिल्ली :** भारतीय टी-२० क्रिकेट संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने फिटनेस चाचणी उत्तीर्ण केली आहे. आता तो ९



सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कपमध्ये भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व करेल. वृत्तसंस्था पीटीआयनुसार, ३४ वर्षीय सूर्यकुमार १९ ऑगस्ट रोजी मुंबईत निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्यासोबत १५ सदस्यीय भारतीय संघाची निवड करतील. जून २०२५ मध्ये जर्मनीतील म्युनिक येथे सूर्यकुमार यादववर स्पोर्ट्स हर्निया (उजव्या खालच्या ओटीपोटावर) शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर त्याने बंगळुरूमधील सेंटर ऑफ एक्सलन्स येथे त्याचा पुनर्वसन कार्यक्रम पूर्ण केला आणि आता तो पूर्णपणे तंदुरुस्त घोषित करण्यात आला आहे. इंडियन प्रीमियर लीग २०२५ चा हंगाम संपल्यानंतर तो तज्ञांचा सल्ला घेण्यासाठी युनायटेड किंग्डमलाही गेला होता. शस्त्रक्रियेनंतर सोशल मीडियावर पोस्ट करताना लिहिले, जीवन अपडेट खालच्या उजव्या पोटात स्पोर्ट्स हर्नियासाठी शस्त्रक्रिया झाली. शस्त्रक्रिया सुरळीत पार पडली आणि मी बरे होण्याच्या मार्गावर आहे. लवकरच मैदानावर परत येईन अशी आशा आहे.

## बुला चौधरी यांच्या घरी चोरी

**नवी दिल्ली :** माजी दिग्गज जलतरणपटू बुला चौधरी यांच्या राहत्या घरात चोरांनी घुसून त्यांच्या ट्रॉफी आणि मेडल्सची चोरी केली आहे. पश्चिम बंगालमधील हुगळी येथे त्या वास्तव्याला आहेत. त्यांच्या ट्रॉफी कॅबिनेटमध्ये अनेक पुरस्कार होते, ज्यात दीड दशकाहून अधिक काळच्या कारकिर्दीत त्यांनी जिंकलेली १५० हून अधिक पदकं आणि स्मृतिचिन्हे होती. २००९ मध्ये त्यांना मिळालेला पद्मश्री आणि दक्षिण आशियाई फेडरेशन गेम्सच्या दोन चक्रांमध्ये त्यांनी जिंकलेली १० सुवर्णपदकं देखील चोरीला गेली. बुला चौधरी म्हणाल्या की, त्यांनी (चोरांनी) माझ्याकडून अशा गोष्टी हिसकावून घेतल्या ज्या त्यांच्यासाठी खूप अमूल्य आहेत. चोरांनी मागच्या दाराने आत प्रवेश केला आणि पद्मश्री, राष्ट्रपती पुरस्कार, सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकं तसेच विदेशी पुरस्कारांसह अनेक पदकं चोरली. त्यांनी घरातील वस्तूंचेही नुकसान केले आणि बाथरूमच्या बेसिन आणि नळही चोरला.पश्चिम बंगालच्या हुगळी जिल्ह्यातील माजी राष्ट्रीय जलतरण विजेत्या बुला चौधरी यांची चोरीला गेलेली २९५ पदकं, ज्यात सुवर्णपदकं आणि पद्मश्री पदकं समाविष्ट होती ती पोलिसांनी जप्त केली आणि रविवारी रिश्रा परिसरातून एका व्यक्तीला अटक केली आहे.सध्या कोलकाता येथे त्यांच्या कुटुंबासह राहणाऱ्या बुला चौधरी अधूनमधून त्यांच्या वडिलोपार्जित घरी जातात. त्यांचा भाऊ, डोलन चौधरी, घराची देखरेख आणि तिथे तिच्या आजी-आजोबांसह राहतो. दरोड्यानंतर, डोलन यांनी निराशा व्यक्त केली की घरात यापूर्वी तीन वेळा चोरी झाली होती आणि पोलिसांकडे तक्रारी करूनही घटना सुरूच राहिल्या. पूर्वी एक पोलिस चौकी उभारण्यात आली होती.

## डायमंड लीगच्या अंतिम फेरीत सहभागी होणार नीरज चोप्रा

**नवी दिल्ली :** भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा डायमंड लीग-२०२५ च्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे. सिलेसिया स्टेजनंतर नीरजने अंतिम टेबलमध्ये १५ गुणांसह तिसरे स्थान पटकावले आणि २७ आणि २८ ऑगस्ट रोजी स्वित्झर्लंडमधील झुरिच येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. २७ वर्षीय नीरजने १६ ऑगस्ट रोजी पोलंडमध्ये झालेल्या सिलेसिया फेरीत भाग घेतला नव्हता. तथापि, त्याने मे महिन्यात दोहा डायमंड लीगमध्ये ९०.२३ मीटरचा कारकिर्दीतील सर्वोत्तम थ्रो फेकला आणि दुसरे स्थान पटकावले. त्यानंतर जून महिन्यात पॅरिस डायमंड लीगमध्ये नीरजने ८८.१६ मीटर थ्रो फेकून पहिले स्थान पटकावले. ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, नीरज पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि तो डायमंड लीगच्या अंतिम फेरीत सहभागी होईल.सध्या नीरज चोप्रा चेक रिपब्लिकमध्ये सराव करत आहे. नीरज चोप्रा १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. या यादीत केशॉर्न वॉलकॉट (१७ गुण) पहिल्या आणि ज्युलियन वेबर (१५) दुसऱ्या स्थानावर आहेत. ब्रुसेल्स फेरीनंतर अंतिम टेबलमधील टॉप-६ खेळाडू झुरिच येथे होणाऱ्या डायमंड लीग फायनलसाठी पात्र ठरतील. २०२२ मध्ये डायमंड लीगचे विजेतेपद जिंकणारा नीरज चोप्रा २२ ऑगस्ट रोजी ब्रुसेल्समध्ये होणाऱ्या डायमंड लीगच्या अंतिम फेरीत सहभागी होणार नाही हे देखील ज्ञात आहे. तथापि, या फेरीत त्याचा सहभाग किंवा गैरसहभाग त्याच्या अंतिम क्रमवारीत कोणताही फरक पडणार नाही, तो आधीच डायमंड लीगच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला आहे.

## रिंकू सिंहचा गोलंदाजीत धुमाकूळ!

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेश प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेला सुरूवात झाली आहे. या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात, रिंकू सिंहच्या संघाने विजयाने सुरूवात केली आहे. मेरठ मॅव्हेरिक्स संघाने कानपूर सुपरस्टार्सचा ८६ धावांनी पराभव करून मोहिमेला दणक्यात सुरूवात केली. मेरठचा कर्णधार रिंकू सिंगला फलंदाजीची संधी मिळाली नाही, पण त्याने गोलंदाजीत मात्र संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. रिंकू सिंहने गोलंदाजी करताना कमालीच्या चेंडूवर फलंदाजाला त्रिफळाचीत केलं. त्याची गोलंदाजी पाहून समालोचकही आश्चर्यचकित झाले. शिवाय त्याने पहिल्याच चेंडूवर विकेट घेतली त्यामुळे सर्वच जण अवाक् झालेरिंकूने चौथं षटक टाकण्याची जबाबदारी घेतली. तो रनअप घ्यायच्या तयारीत असताना, समालोचक म्हणाले, माझे डोळे तर ठिक आहेत ना? हे मी काय पाहतोय? यानंतर रिंकूने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत समालोचक अजून चकित झाले. रिंकूने पहिल्याच चेंडूवर आदर्श सिंगला बाद केलं. रिंकू सिंह हा ऑफस्पिनर असून तो पार्ट टाईम गोलंदाज आहे. त्यामुळे फलंदाज त्याच्या गोलंदाजीवर मोठा फटका खेळण्याच्या तयारीत होता. फलंदाज स्टंप सोडून मोठा फटका खेळायला गेला आणि रिंकूचा योग्य लाईनवर टाकलेला चेंडू टप्पा पडून थेट स्टंपवर जाऊन आदळला. विकेट मिळताच रिंकूने गर्जना करत आक्रमक सेलिब्रेशन केलं आणि संघाला विकेट मिळवून दिली. रिंकू सिंहने २ षटकांत १८ धावा देऊन १ विकेट घेतली. चौथ्या षटकानंतर त्याने शेवटचं षटक टाकलं. रिंकूच्या पहिल्या षटकात ५ धावा केल्या. सर्व धावा एकेरी धाव घेत फलंदाजांनी केल्या. यानंतर रिंकू अखेरचं षटक टाकण्यासाठी आला. २० व्या षटकात फलंदाजी करणाऱ्या संघाने १३ धावा झाल्या.

# सर्फराझ खानचं वादळी शतक!

### टीम इंडियातून डच्चू मिळाल्यानंतर बॅटने दिलं उत्तर; मुंबईचा सावरला डाव



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताचा विस्फोटक फलंदाज सर्फराझ खानने मुंबईकडून खेळताना जबरदस्त शतक झळकावलं आहे. इंग्लंडविरूद्ध झालेल्या कसोटी मालिकेत सर्फराझची संघात निवड झाली नव्हती. इंग्लंडविरूद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत अनेक युवा खेळाडूंनी संधी देण्यात आली होती. पण सर्फराझ खानला मात्र या संघातून वगळण्यात आलं. सर्फराझने आता संधी मिळताच शानदार शतक झळकावलं आहे.

सर्फराझ खानने बूची बाबू स्पर्धेत खेळताना शानदार शतक झळकावलं आहे. बूची बाबू स्पर्धेला सुरूवात झाली आहे. ही स्पर्धा तामिळनाडू क्रिकेट असोसिएशनद्वारे १८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान आयोजित केली जात आहे. या स्पर्धेत १६ संघ सहभागी होत आहेत, ज्यांना प्रत्येकी चार संघांच्या चार गटात विभागण्यात आले आहे.

बूची बाबू स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताचा स्टार फलंदाज सर्फराझ खानने शतक झळकावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. टीएनसीएविरुद्ध फलंदाजी करताना सर्फराझ खानने शानदार शतकी खेळी खेळली आणि संघाचा डाव सावरला.

सर्फराझ खानने पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना शतक झळकावलं आहे. जेव्हा तो फलंदाजीला आला तेव्हा मुंबईने ९८ धावांवर तीन विकेट गमावल्या होत्या. त्यानंतर सर्फराझ खानने संघाचा डाव सावरला आणि वादळी शतक झळकावलं. सर्फराझ फक्त ९२ चेंडूत १०० धावांचा टप्पा गाठला. यादरम्यान त्याने ९ चौकार आणि ३ षटकारही लगावले.

सर्फराझ गेल्या काही दिवसांपासून त्याच्या फिटनेसमुळे चर्चेत आहे. टीम इंडियामध्ये निवड न झाल्याने त्याच्या फिटनेसवर खूप मेहनत घेतली. सर्फराझ खानने फक्त दीड महिन्यात सुमारे १७ किलो वजन कमी करून सर्वांना आश्चर्यचकित केलं. वजन कमी केल्यानंतर हा त्याचा पहिलाच सामना आहे आणि या सामन्यात तो आपली छाप पाडण्यात यशस्वी झाला आहे. सर्फराझ खान आता वेस्ट इंडिजविरूद्ध खेळल्या जाणाऱ्या घरच्या कसोटी मालिकेत आपले स्थान निश्चित करण्यावर त्याच्या नजरा आहेत. सर्फराझ खानचा धाकटा भाऊ मुशीर खान हा देखील या स्पर्धेत मुंबई संघाचा भाग आहे. पण या स्पर्धेच्या सुरुवातीच्या डावात तो काही खास कामगिरी करू शकला नाही. या सामन्याच्या पहिल्या डावात मुशीर खानला ७५ चेंडूंत फक्त ३० धावा करता आल्या.

# आशिया चषकासाठी बुमरा सज्ज!

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराने आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० स्पर्धेसाठी आपण उपलब्ध असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) कळविले आहे. काही दिवसांपूर्वी बुमरा आणि निवड समिती सदस्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.



यंदा आशिया चषक स्पर्धा ट्वेन्टी-२० प्रारूपात संयुक्त अरब अमिराती येथे ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत रंगणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा मंगळवारी (१९ ऑगस्ट) मुंबई येथे करण्यात येईल. त्यापूर्वी बुमरा आणि अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये चर्चा झाली. आगामी आशिया चषक स्पर्धेसाठी आपण उपलब्ध असल्याचे बुमराने निवड समितीला कळविले आहे.

गेल्या काही काळापासून बुमराच्या तंदुरुस्तीबाबत बरीच चर्चा केली जात आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड दौऱ्यात कार्यभार व्यवस्थापनांतर्गत बुमरा पाचपैकी दोन कसोटी सामन्यांना मुकला. लॉर्ड्स येथे झालेल्या तिसऱ्या कसोटीसाठी त्याचे पुनरागमन झाले. ओल्ड ट्रॅफर्ड येथील चौथ्या कसोटीतही तो खेळला. मात्र, भारतीय संघ १-२ असा पिछाडीवर असूनही बुमराने मालिकेतील निर्णायक पाचवा सामना खेळणे टाळले. त्यामुळे त्याच्यावर बरीच टीकाही झाली.

सध्या विश्वातील सर्वोत्तम गोलंदाज अशी ख्याती असलेल्या बुमराला कारकीर्दीदरम्यान विविध दुखापतींचा सामना करावा लागला आहे. आशिया चषक स्पर्धा ट्वेन्टी-२० प्रारूपात होणार असल्याने बुमराला मोठे स्पेल टाकावे लागणार नाहीत. शिवाय, साखळी फेरीत भारताला पाकिस्तानव्यतिरिक्त ओमान आणि संयुक्त अरब अमिराती या तुलनेने दुबळ्या संघांविरुद्ध खेळायचे असल्याने गरज वाटल्यास बुमराला विश्रांतीही दिली जाऊ शकेल.

## बार्सिलोनाची मायोर्कावर मात

**| माद्रिद | वृत्तसंस्था |**

आघाडीच्या खेळाडूंनी केलेल्या चमकदार कामगिरीमुळे गतविजेत्या बार्सिलोनाने ला लिगा फुटबॉल सामन्यात मायोर्कावर ३-० असा विजय मिळवत हंगामाची दमदार सुरुवात केली. सुरुवातीपासूनच बार्सिलोना संघाने आक्रमक खेळ केला. सामन्याच्या सातव्या मिनिटाला लामिने यमालच्या क्रॉसवर राफिन्हाने गोल करीत संघाला आघाडीवर नेले.

यानंतर सामन्याच्या २३व्या मिनिटाला बार्सिलोनाकडून फेरान टोरेसने गोल झळकावत संघाची आघाडी दुप्पट केली. या गोलविरुद्ध मायोर्काने पंचांकडे तक्रार केली. कारण, त्यांच्या एका खेळाडूच्या डोक्याला चेंडू लागून तो जमिनीवर पडला. पंचांनी मात्र, त्यांना फारसा प्रतिसाद दिला नाही.

## आशिया कपमधून बाबरला वगळल्याबद्दल वाद



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) रविवारी ९ सप्टेंबरपासून यूएईमध्ये सुरू होणाऱ्या आशिया कप आणि त्यापूर्वी २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी (यूएई आणि अफगाणिस्तानसह पाकिस्तान) १७ सदस्यीय संघाची घोषणा केली. या घोषणेत, वरिष्ठ फलंदाज बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांना वगळण्याचा धक्कादायक निर्णय घेण्यात आला, त्यानंतर निवडकर्त्यांवर टीका होत आहे.

माजी पाकिस्तानी क्रिकेट दिग्गज जावेद मियांदाद यांनी निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, निवडकर्त्यांना स्वतःला माहित नाही की ते काय करत आहेत. त्यांनी कधी क्रिकेट खेळले आहे का? बाबर आझम सारख्या महान खेळाडूला वगळणे हे समजण्यापलीकडे आहे. क्रिकेटमध्ये चढ-उतार येणे स्वाभाविक आहे. खेळाडूला योग्य वेळी आत्मविश्वासाने कामगिरी करावी लागते. सलमान अली आगाकडे कमांड, फखर जमान परतला या संघात वरिष्ठ वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी, मोहम्मद वसीम आणि डावखुरा वेगवान गोलंदाज सलमान मिर्झा यांचा समावेश आहे.

## भारत-अ संघ तिसरा महिला वनडे हरला

### ऑस्ट्रेलिया-अ संघ २ विकेट्सनी विजयी, भारताने मालिका २-१ ने जिंकली

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असलेल्या भारत-अ महिला संघाला तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलियाने हा सामना ९ विकेट्सने जिंकला. तथापि, भारताने तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली.

रविवारी, ब्रिस्बेनमधील इयान हिली ओव्हल स्टेडियमवर भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाला ४७.४ षटकांत सर्व विकेट गमावून २१६ धावा करता आल्या.

प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने २७.५ षटकांत एक विकेट गमावून लक्ष्य गाठले. ऑस्ट्रेलियाकडून एलिसा हिलीने नाबाद शतक (१३७ धावा) आणि ताहलिया विल्सनने अर्धशतक (५९ धावा) केले. चांगली सुरुवात



असूनही, भारतीय संघ मोठी धावसंख्या करू शकला नाही

भारतीय सलामीवीर शेफाली वर्मा आणि नंदिनी कश्यप यांनी पहिल्या विकेटसाठी ८६ धावांची दमदार भागीदारी केली. तथापि, ८८ आणि ८९ च्या धावसंख्येवर नंदिनी कश्यप आणि तेजल हसबनीस यांच्या सुरुवातीच्या विकेट गेल्याने भारताला मोठा धक्का बसला.

यानंतर, यास्तिका भाटियाने ५४ चेंडूत ४२ धावा करत डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला, परंतु संघ ४७.४ षटकांत २१६ धावांवर ऑलआउट झाला.ऑस्ट्रेलियाकडून ताहलिया मॅकग्राने ८ षटकांत ४० धावा देत ३ बळी घेतले. एला हेवर्डने १० षटकांत ४३ धावांत २ बळी घेतले, सिएना जिंजरने ८.४ षटकांत ५० धावांत २ बळी घेतले आणि अनिका लिरॉयडने ३ षटकांत १६ धावांत २ बळी घेतले.

## ईशान किशन स्पर्धेतून बाहेर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

दुखापतीमुळे यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशन दुलीप ट्रॉफी २०२५ मधून बाहेर पडला आहे. काही आठवड्यांपूर्वी त्याला पूर्व विभागाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले होते, परंतु आता तो २८ ऑगस्टपासून बेंगळुरू येथे सुरू होणाऱ्या सहा संघांच्या स्पर्धेत भाग घेणार नाही. त्याच्या जागी पूर्व विभागाच्या संघात ओडिशाचा २० वर्षीय यष्टीरक्षक-फलंदाज आशीर्वाद स्वेन याला स्थान देण्यात आले आहे. बंगालचा २९ वर्षीय उजव्या हाताचा फलंदाज अभिमन्यू ईश्वरन, जो पूर्वी उपकर्णधार होता, त्याला आता कर्णधार बनवण्यात आले आहे.

स्वेनने ओडिशासाठी ११ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ६१५ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याची सर्वोत्तम धावसंख्या ७७ आहे. त्याने तीन अर्धशतके झळकावली आहेत आणि यष्टीमागे ३५ बळी घेतले आहेत, ज्यात ३२ झेल आणि ३ स्टम्पिंगचा समावेश आहे. ओडिशा क्रिकेट असोसिएशनने गुरुवारी पूर्व विभागाच्या संघात स्वेनचा समावेश झाल्याची पुष्टी केली. ओडीशा क्रिकेट असोसिएशनने लिहिले की, ओडिशाचा यष्टीरक्षक-फलंदाज आशीर्वाद स्वेनची दुलीप ट्रॉफीसाठी पूर्व विभागाच्या संघात निवड झाली आहे. तो इशान किशनची जागा घेईल आणि संदीप पटनायकसह संघात सामील होईल. इशान किशनने त्याचा शेवटचा सामना २९ जून ते २ जुलै २०२५ दरम्यान नॉटिंगहॅमशायरकडून टॉन्टन येथे सोमरसेटविरुद्ध खेळला होता, ज्यामध्ये त्याने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ७७ धावा केल्या होत्या.

## कॉलिन मुनरोची विक्रमी सेंच्युरी!

### सूर्यासह गिलची बरोबरी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

कॅरेबियन प्रीमियर लीग २०२५ च्या चौथ्या सामन्यात ट्रिनबागो नाइट रायडर्स संघाकडून सलामीवीराच्या रुपात तगडी बॅटिंग करताना कॉलिन मुनरो याने विक्रमी शतक झळकावले आहे. न्यूझीलंडच्या ३८ वर्षीय बॅटरनं वादळी खेळी करताना ५७ चेंडूत १२० धावांची खेळी केली. १४ चौकार आणि ६ षटकारासह बहरलेल्या खेळीसह त्याने गिलच्या खास क्लबमध्ये एन्ट्री मारताना सूर्यकुमार यादव आणि शुबमन गिल यांच्या विक्रमाशी बरोबरी साधली .

सेंट किट्सच्या बैसेटेरे येथील वॉर्नर पार्क स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात शाहरुखच्या सहमालकीच्या ट्रिनबागो नाइट रायडर्स संघाकडून मैदानात उतरलेल्या कॉलिन मुनरो शतकी खेळीसह खास



विक्रमाला गवसणी घातली. कॅरेबियन प्रीमियर लीगमध्ये शतक झळकवणारा तो दुसरा वयस्क खेळाडू ठरला आहे. ३८ वर्षे आणि १५९ वयात त्याने हा पराक्रम केला आहे. याबाबतीत फक्त ख्रिस गेल त्याच्या पुढे आहे. युनिवर्स बॉस ख्रिस गेलनं ३९ वर्षे आणि ३५४ दिवस वयात या लीगमध्ये शतक ठोकल्याचा रेकॉर्ड आहे.

कॉलिन मुनरो याने सूर्या-गिलची विक्रमाशीही केली बरोबरीकॉलिन मुनरोनं सेंट किट्स अँण्ड नेविस पॅट्रियट्स विरुद्धच्या शतकी खेळीसह दोन भारतीयांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. न्यूझीलंड बॅटरचं टी-२० क्रिकेटमधील हे सहावे शतक ठरले. सूर्यकुमार यादव आणि शुबमन गिल या दोघांनीही टी-२० क्रिकेटमध्ये ६ शतके झळकवल्याचा रेकॉर्ड आहे.

कॉलिन मुनरोच्या दमदार शतकी खेळीशिवाय हेल्सनं २७ चेंडूत कुटलेल्या ४७ धावांच्या खेळीच्या जोरावर ट्रिबेंगो नाइट रायडर्सच्या संघाने निर्धारित २० षटकात ५ विकेट्सच्या मोबदल्यात २३१ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना सेंट किट्स संघाकडून एकालाही मोठी खेळी करता आली नाही. कर्णधार जेसन होल्डरनं २२ चेंडूत केलेल्या ४४ धावांच्या खेळीशिवाय कायले मेयर्स ३२ (२२), आंद्रे फ्लेचर ४१ (२६) आणि रायली रॉसू ३८ (२४) धावांचे योगदान दिले.

### स्टुटगार्टवर मात | पदार्पणात लुइस डियाझचा गोल; केनचे हे कारकीर्दीतील दुसरे जेतेपद

## बायर्न म्युनिकला जर्मन सुपर चषकाचे जेतेपद

**| बर्लिन | वृत्तसंस्था |**

लुइस डियाझने पदार्पणात साकारलेल्या गोलमुळे बलाढ्य बायर्न म्युनिक संघाने स्टुटगार्टवर २-१ अशी मात करत जर्मन सुपर चषकाचे जेतेपद पटकावले. बायर्नचा अन्य गोल तारांकित आघाडीपटू हॅरी केनने नोंदवला. हंगामाची सुरुवात जेतेपदासह करणे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. आमचा आत्मविश्वास दुणावला असून बुंडसलिगाच्या नव्या हंगामासाठी आम्ही सज्ज आहोत, असे केन म्हणाला. केनचे हे कारकीर्दीतील दुसरे जेतेपद होते. बायर्नने बुंडसलिगा जिंकली होती. त्या वेळी केनने पहिल्या जेतेपदाचा अनुभव घेतला होता.





जर्मन सुपर चषकात केननेच बायर्नला आघाडी मिळवून दिली. त्याने १८व्या मिनिटाला हा गोल केला. यानंतर बायर्नने चेंडूवर ताबा राखला होता. तसेच त्यांनी गोलच्या काही संधीही निर्माण केल्या, पण त्यांना मध्यंतरापर्यंत केवळ एका गोलच्या आघाडीचे समाधान लाभले. उत्तरार्धातही बायर्नचे वर्चस्व राहिले. सामन्याच्या ७७व्या मिनिटाला सर्ज गनाब्रीच्या पासवर लुइस डियाझने गोल करत बायर्नची आघाडी दुप्पट केली. नव्या हंगामापूर्वी बायर्नने डियाझला इंग्लिश क्लब लिव्हरपूलकडून आपल्या संघात समाविष्ट करून घेतले. त्याने पहिल्याच सामन्यात गोल करत हा विश्वास सार्थ ठरवला.

यानंतर स्टुटगार्टने पुनरागमनाचा प्रयत्न केला. स्टुटगार्टचा आघाडीपटू निक वोल्टेमेडने मारलेला फटका बायर्नचा गोलरक्षक मॅन्युएल नॉयरने अप्रतिमरीत्या अडवला. ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत जेमी लेव्हलिंगने स्टुटगार्टचे गोलखाते उघडले. मात्र, त्यांना दुसरा गोल करता आला नाही आणि बायर्नने जेतेपद पटकावले.

## सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धा आजपासून

**| सेंट लुइस | वृत्तसस्था |**

अतिजलद प्रकारातील निराशेनंतर दोम्माराजू गुकेशचे पारंपरिक प्रकारात कामगिरी उंचावण्याचेलक्ष्यअसूनसोमवारपासून सुरू होणाऱ्या सिंकेफिल्ड चषक स्पर्धेत तो सहभाग नोंदवेल. त्याचा भारतीय सहकारी ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदही विजयमंचावर येण्याच्या उद्देशानेच या स्पर्धेत खेळेल. ग्रँड चेस टूरच्या पाचव्या टप्प्यातील या स्पर्धेत मॅग्नस कार्लसन खेळणार नाही. ङ्गपारंपरिकफ बुद्धिबळ खेळण्यातील आपला रस कमी होत चालल्याचे कार्लसनने अनेकदा बोलून दाखवले आहे. त्याच्या अनुपस्थितीत गुकेशला जेतेपदाची उत्तम संधी आहे. नुकत्याच झालेल्या सेंट लुइस जलद आणि अतिजलद स्पर्धेत गुकेश सहाव्या स्थानी राहिला होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)